मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in   E mail - dainikyuvakaadhar@gmail.com   facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २६६ ■ मंगळवार, ०९ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# पेरणीच्या तोंडावर निसर्गाचा घाला; पलसखेडच्या शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त, आता मदतीचा हात कोण देणार?

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : पलसखेड,(रिसोड) एकीकडे खरीप हंगामाच्या पेरणीची तयारी सुरू असताना, दुसरीकडे अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने पलसखेड येथील शेतकऱ्यांच्या आशांवर अक्षरशः पाणी फेरले आहे. आधीच वाढते उत्पादन खर्च, बाजारातील अनिश्चितता आणि आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यांना आता निसर्गाच्या या तडाख्याने अक्षरशः उघड्यावर आणून सोडले आहे.

गावातील शेतकरी आसरुजी ज्ञानबा खानझोडे यांच्या शेतातील घर आणि गोठ्याच्या भिंती कोसळल्या असून संपूर्ण परिसरात हाहाकाराचे चित्र निर्माण झाले आहे. अनेक महिन्यांच्या कष्टातून साठवून ठेवलेले सोयाबीनचे १५ पोते, मुगाचे ५ पोते आणि हरभऱ्याचे ३ पोते पावसाच्या पाण्यात भिजून खराब झाले आहेत. एका शेतकऱ्यासाठी हे केवळ धान्याचे पोते नसून त्याच्या कुटुंबाच्या वर्षभराच्या उदरनिर्वाहाचा आधार असतो. मात्र अवकाळी पावसाने हा आधारच हिरावून घेतला आहे.

तसेच अर्जुन खरात यांच्या घराची भिंत कोसळून छतावरील पत्रे उडून गेली आहेत. त्यांच्या शेतातील सौरऊर्जा यंत्रणेचेही मोठे नुकसान झाले असून शेतीच्या दैनंदिन कामांवर त्याचा परिणाम होणार आहे. अचानक झालेल्या या नुकसानीमुळे संबंधित कुटुंबांवर आर्थिक संकटाचे काळे ढग दाटून आले आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शेतकरी आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबला गेला आहे. अशा परिस्थितीत पेरणीच्या तोंडावर झालेले हे नुकसान त्याला पुन्हा उभे राहण्याचे मोठे आव्हान निर्माण करणारे आहे. शासनाच्या विविध योजना कागदावर असल्या तरी प्रत्यक्षात मदत किती वेगाने पोहोचते, हा खरा प्रश्न आहे.

आज या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या डोळ्यांत एकच प्रश्न दिसून येत आहे — "आता आमचा वाली कोण?"



घर पडले, गोठे उद्ध्वस्त झाले, धान्य भिजले, सौरयंत्रणा खराब झाली... आता या नुकसानीची भरपाई कोण करणार? संबंधित अधिकारी तातडीने पंचनामा करतील का? आमदार, खासदार, पालकमंत्री या शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकतील का? शासनाकडून त्वरित आर्थिक मदत मिळेल का? की नेहमीप्रमाणे पंचनामे, अहवाल आणि आश्वासनांच्या गर्तेतच हे प्रकरण अडकून राहणार?

पलसखेडमधील या घटनेने पुन्हा एकदा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या असुरक्षित जीवनावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. शेतकरी दिवस-रात्र कष्ट करून अन्नधान्य पिकवतो; मात्र संकटाच्या काळात त्याच्यासाठी तत्काळ मदतीचा हात पुढे येणे गरजेचे आहे. अन्यथा निसर्गाच्या एका झटक्यात उद्ध्वस्त झालेल्या या कुटुंबांचे पुनर्वसन करणे अधिक कठीण होणार आहे.

## ■ अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याने घर, गोठे, धान्यसाठा आणि सौरयंत्रणा उद्ध्वस्त;
## ■ प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि शासनाकडे मदतीची आर्त हाक

> **"आज पलसखेडमधील शेतकरी अक्षरशः उघड्यावर आला आहे. घराच्या भिंती कोसळल्या, गोठे उद्ध्वस्त झाले, कष्टाने साठवून ठेवलेले धान्य भिजून खराब झाले. पेरणीच्या तोंडावर आलेले हे संकट अत्यंत वेदनादायी आहे. शासनाने केवळ पंचनामे करून थांबू नये, तर तात्काळ आर्थिक मदत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी. जिल्ह्याचे पालकमंत्री, आमदार, खासदार आणि वरिष्ठ प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन मदतीसाठी पुढाकार घ्यावा. संकटाच्या काळात शेतकऱ्याला आधार देणे हेच खरे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचे कर्तव्य आहे. शेतकरी वाचला तरच शेती वाचेल आणि शेती वाचली तरच अन्नदात्याचा सन्मान टिकून राहील."**
>
> **— अर्जुन पाटील खरात**
> **जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, वाशिम**

याच पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडचे दबंग जिल्हाध्यक्ष अर्जुन पाटील खरात यांनी तत्काळ रिसोडच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून पलसखेड येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. आसरुजी ज्ञानबा खानझोडे व अर्जुन खरात यांच्या शेतातील घर, गोठे, धान्यसाठा तसेच सौरऊर्जा यंत्रणेच्या नुकसानीची माहिती देत तातडीने पंचनामा करून शासनाची मदत मिळवून देण्याची मागणी त्यांनी केली. यासोबतच संबंधित परिसराच्या तलाठी रेंगे मॅडम यांच्याशीही दूरध्वनीवरून संपर्क साधून घडलेल्या नुकसानीची माहिती देण्यात आली व त्वरित घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याची विनंती करण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाने संवेदनशीलता दाखवून तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा अर्जुन पाटील खरात यांनी व्यक्त केली.

---

# अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत मेघराज राजे भोसले गटाचे निर्विवाद वर्चस्व

**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते** : अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीचा निकाल सोमवारी (८ जून) जाहीर झाला असून, माजी अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांच्या नेतृत्वाखालील समर्थ पॅनलने दणदणीत विजय मिळवला आहे. राज्यभर चर्चेत राहिलेल्या या निवडणुकीत भोसले समर्थकांनी सर्व जागांवर बाजी मारत आपली मजबूत पकड कायम राखली.




या निवडणुकीत समर्थ पॅनलचे सर्व १४ उमेदवार विजयी झाले. याशिवाय यापूर्वी बिनविरोध निवडून आलेल्या तीन सदस्यांपैकी दोन सदस्यांनीही भोसले गटाला पाठिंबा दिल्याने निकालापूर्वीच त्यांच्या पारड्यात वजन वाढल्याचे दिसून आले होते.

निवडणुकीपूर्वी महामंडळाच्या निवडणूक प्रक्रियेवरून मोठ्या प्रमाणात वाद निर्माण झाले होते. ज्येष्ठ अभिनेते विजय पाटकर यांनी निवडणुकीत राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोप करत काही गंभीर मुद्दे उपस्थित केले होते. त्यामुळे चित्रपटसृष्टीसह राजकीय वर्तुळातही या निवडणुकीची चर्चा रंगली होती.

मात्र, सर्व वाद आणि आरोपांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या मतदानानंतर भोसले समर्थ पॅनलने स्पष्ट बहुमत मिळवत विजयाची नोंद केली. या निकालामुळे महामंडळाच्या पुढील कारभारात भोसले गटाचे नेतृत्व कायम राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

निकाल जाहीर होताच विजयी उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकार, निर्माते आणि तंत्रज्ञांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले. नव्या कार्यकारिणीकडून उद्योगाशी संबंधित विविध प्रश्न सोडवण्यासाठी प्रभावी पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, निवडणुकीदरम्यान उद्भवलेल्या वादांमुळे महामंडळाच्या कार्यपद्धतीबाबत काही प्रश्न उपस्थित झाले असले तरी आता सर्व घटकांनी मतभेद बाजूला ठेवून मराठी चित्रपटसृष्टीच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे काम करावे, अशी भावना चित्रपट क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे. नव्या नेतृत्वासमोर उद्योगातील आर्थिक, तांत्रिक आणि संघटनात्मक आव्हानांचा सामना करण्याचे मोठे दायित्व असणार आहे.

---

# उमरी रेल्वे स्थानकातील लिफ्ट बंद नागरिकांचे बेहाल प्रशासनाचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर रुपेशकुमार. श्रीरामवार :** उमरी रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक १ वरुन २ वर जाण्यासाठी लिफ्ट सुविधा उभारण्यात आली आहे. लिफ्टचे काम देखील पूर्ण झाले असून मात्र ही सेवा अजून ही सुरु झाली नसल्याने ज्येष्ठ महिला, पुरुष प्रवासी, विविध रुग्ण प्रवासी यांचे बेहाल होत आहेत. ही लिफ्ट उभारुन दहा महिने झाले मात्र अजून ही लिफ्ट प्रवाशांच्या सेवेसाठी सुरु करण्यात आली नसुन प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. परिणामी विविध प्रवाशांना दादरा पैदल जिना पायी चढावा लागत आहे. त्यातही सोबतचे साहित्य घेऊन चढणे अवघड होत आहे. मधुमेह, रक्तदाब, हृदयविकारासारख्या रुग्णांना मोठा त्रास होत आहे. लवकरात लवकर ही लिफ्ट सुरु करुन प्रवाशांला दिलासा द्यावा अशी प्रवासी जनतेतून मागणी होत आहे.



---

# आमदार प्रशांत ठाकूर यांची महावितरण कार्यालयात धडक

## खंडित वीजपुरवठ्याबाबत अधिकाऱ्यांना जाब विचारत व्यक्त केली नाराजी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** कामोठेसह पनवेल परिसरातील विविध भागांमध्ये सातत्याने होत असलेल्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या गंभीर समस्येमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि.७) थेट भिंगारी येथील महावितरण कार्यालयात धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी त्यांनी कार्यकारी अभियंत्यांसोबत सविस्तर चर्चा करून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.पनवेल, कामोठे तसेच आसपासच्या परिसरात नियमितपणे वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक, व्यापारी आणि विद्यार्थीवर्गाला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी निदर्शनास आणून दिले.




महावितरणकडून या समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना दिल्या. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तातडीने आणि प्रभावी उपाययोजना राबविण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली तसेच नागरिकांना वारंवार होणाऱ्या त्रासातून दिलासा मिळावा यासाठी आवश्यक तांत्रिक सुधारणा आणि देखभाल कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही दिले.यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी इशारा देताना सांगितले की, महावितरणचा निष्काळजीपणा आणि दुर्लक्षपणा यापुढे खपवून घेतला जाणार नाही. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी त्वरित पावले उचलली नाहीत, तर जनआंदोलन छेडले जाईल तसेच महावितरणचा असाच ढिसाळ कारभार सुरू राहिल्यास संबंधित कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल.या प्रसंगी भाजपचे कामोठे मंडळ अध्यक्ष व नगरसेवक विकास घरत, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, प्रदीप भगत, रवींद्र जोशी तसेच दामोदर चव्हाण व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या या महत्त्वाच्या प्रश्नावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे महावितरण प्रशासनावर दबाव वाढला असून आगामी काळात वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी कोणती पावले उचलली जातात याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---

# रसायनीतील प्राथमिक शाळेवर बंदीची टांगती तलवार, 10 जूनपासून आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** मोहोपाडा रसायनी येथील महिला उद्योग मंडळ संचलित प्राथमिक शाळेवर रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षण विभागाने कारवाई न केल्याने अरुण शांताराम गायकवाड यांनी 10 जूनपासून प्राथमिक शिक्षण विभाग रायगड यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा दिला असल्याचे मोहोपाडा आळी आंबिवली येथे रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिला. तसेच या कार्यवाहीचे पत्र शिक्षण विभाग, जिल्हाधिकारी, रायगड जिल्हा परिषद, पोलिस अधीक्षक, खालापूर पंचायत समिती, पोलिस उपविभागीय कार्यालय व सभापती यांना सादर केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

सदर शाळा 60 टक्के शासन अनुदानित असून देखील विद्यार्थ्यांकडून मासिक फि व डोनेशन स्वरूपात अवैधरित्या रक्कम आकरित आहे.तसेच नियमानुसार स्वतःची जागा असणे आवश्यक असताना सदर शाळा एचओसी कंपनीच्या जागेत चालविण्यात येत आहे. शिवाय वाढीव



तुकड्या विनापरवानगी सुरू असल्याची गंभीर बाब निदर्शनास आल्याचे तक्रारकर्ते अरुण गायकवाड यांनी बोलताना सांगितले. शिक्षण विभाग अलिबाग यांनी खालापूर गटविकास अधिकारी यांना वस्तुनिष्ठ अहवाल दोन दिवसांत सादर करण्याचे निर्देश दिले असतानाही कोणतीही कार्यवाही न झाल्याचा आरोप अरुण गायकवाड यांनी केला आहे. शाळेची इमारत धोकादायक असून विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका असल्याचे बांधकाम विभाग तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाने नमूद केले असतानाही कोणतीही कार्यवाही नाही.

दरम्यान संस्थेचे कार्याध्यक्ष अरुण गायकवाड व सामाजिक कार्यकर्ते आकाश कांबळे यांनी दिलेल्या ८ नोव्हेंबर २०२४ च्या तक्रार अर्जानुसार ही शाळा विनापरवानगी स्थलांतरित करून पालक आणि शिक्षण विभागाची फसवणूक करीत असल्याचे दिसून आले आणि त्यामुळे ७ फेब्रुवारी २०२५ रोजी चौकशीचे आदेश हे गटशिक्षण अधिकारी खालापूर यांनी दिले. चौकशीदरम्यान सिद्ध झाले की, ही शाळा एचओसी कंपनीच्या जीर्ण होत असलेल्या धोकादायक इमारतीमध्ये भरत असून, ती विनापरवाना स्थलांतर केलेली आहे. याविरोधात अरुण गायकवाड आणि आकाश कांबळे यांनी ट्रस्टीविरोधात धर्मादाय आयुक्त अलिबाग,शिक्षण विभाग आणि धर्मादाय आयुक्त, मुंबई येथे तक्रार दाखल केली आहे.

यावेळी अरुण गायकवाड यांनी बोलताना सांगितले की,दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण असून विद्यार्थ्यांकडून घेतलेली फि व इतर रक्कम व्याजासहित पालकांना परत करावी अशी मागणी केली आहे.शिवाय दोषिंवर कडक कारवाईची मागणी करण्यात आली असल्याने शाळेवर बंदीची टांगती तलवा लटकलेली दिसून येत आहे.

# वेदनामुक्त आयुष्याचा नवा प्रवास; मेडिकव्हरच्या ‘मुव्हमेंटम २०२६’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या जॉईंट रोबो – रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सेंटरतर्फे ‘मुव्हमेंटम २०२६’ या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सांध्यांच्या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेनंतर यशस्वी पुनर्प्राप्ती केलेल्या रुग्णांना सन्मानित करत, त्यांना नव्याने मिळालेल्या शारीरीक हालचालींचा आनंद साजरा करणे आणि त्यांच्या जीवनात झालेल्या सकारात्मक बदलांचा गौरव करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

या कार्यक्रमात विविध मनोरंजनात्मक खेळ, संगीत, फिजिओथेरपी सत्रे आणि आरोग्यविषयक संवाद अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामुळे रुग्णांना हालचालीसाठी प्रोत्साहन मिळाले तसेच सांध्यांच्या आरोग्याबाबत जनजागृतीही करण्यात आली.

या कार्यक्रमाला मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे ऑर्थोपेडिक्स विभागाचे संचालक, रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन व अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. प्रमोद भोर यांच्यासह १०० हून अधिक रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी उपस्थिती दर्शवली. प्रसिद्ध अभिनेत्री गौरी टोंक यांनी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहून रुग्णांशी मनमोकळा संवाद साधला आणि सांध्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या या उपक्रमाला आपला पाठिंबा दर्शविला.



या कार्यक्रमादरम्यान रोबोटिक-असिस्टेड सांध्यांच्या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेतील प्रगती आणि पुनर्वसनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर पुन्हा आत्मविश्वासाने चालू लागलेल्या, हालचालींमध्ये सुधारणा झालेल्या आणि वेदनामुक्त, स्वतंत्र जीवन जगू लागलेल्या रुग्णांच्या प्रेरणादायी अनुभवांनाही याठिकाणी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. प्रमोद भोर म्हणाले,* वयोवृद्धांबरोबरच तरुणांमध्येही ऑस्टिओआर्थरायटिस, लठ्ठपणा, बैठी जीवनशैली, क्रीडा दुखापती आणि वयानुसार होणारी झीज यांमुळे सांध्यांचे विकार वाढत असल्याचे दिसून येत आहे. गुडघे किंवा नितंबातील सततची वेदना, सूज, स्नायुंमधील कडकपणा, चालताना येणाऱ्या अडचणी आणि हालचालींवरील मर्यादा ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. योग्य वेळी उपचार न केल्यास रुग्णांच्या जीवनमानावर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो.

ते पुढे म्हणाले,* रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया ही प्रगत सांध्यांच्या विकारांवरील प्रभावी उपचारपद्धती ठरत आहे. या तंत्रज्ञानामुळे अधिक अचूक शस्त्रक्रिया, व्यक्तीनुसार उपचारांचे नियोजन, इम्प्लांट्स योग्यरित्या बसवणे, कमी रक्तस्त्राव, जलद पुनर्प्राप्ती आणि दीर्घकालीन चांगले परिणाम मिळतात. गुडघा व नितंब प्रत्यारोपणासह जटिल सांध्यांच्या शस्त्रक्रियांमध्येही या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे.

‘मुव्हमेंटम २०२६’ अंतर्गत ‘वॉक ऑफ कॉन्फिडन्स’, ‘सिट-टू-स्टँड चॅलेंज’, ‘स्लो वॉकिंग चॅलेंज’, फिजिओथेरपी सत्रे, रुग्णांचे सकरात्मक अनुभव आणि विविध संवादात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. आतापर्यंत १,००० यशस्वी रोबोटिक-असिस्टेड जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया पूर्ण करत रुग्णांना पुन्हा सक्रिय आणि निरोगी जीवन जगताना पाहणे ही आमच्यासाठी मोठी समाधानाची बाब आहे अशी प्रतिक्रिया डॉ. भोर यांनी व्यक्त केली.

मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या महाराष्ट्र व कर्नाटक विभागाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल म्हणाले,* प्रगत तंत्रज्ञान, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि रुग्णकेंद्रित सेवा यांच्या माध्यमातून आम्ही अस्थिरोग विभाग अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहोत. सर्वसमावेशक सांध्यांच्या आरोग्यसेवेद्वारे रुग्णांना अधिक चांगली हालचाल करण्याची शारीरक क्षमता आणि आरामदायी जीवन मिळवून देणे हे आमचे ध्येय आहे. मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबईचे सेंटर हेड संदीप जोशी म्हणाले,* रुग्णांनी त्यांच्या पुनर्प्राप्तीचा प्रवास साजरा करावा, तज्ज्ञांशी संवाद साधावा, सांध्यांच्या आरोग्याविषयी अधिक जाणून घ्यावे आणि इतर रुग्णांच्या प्रेरणादायी अनुभवांतून बळ मिळवावे, या उद्देशाने ‘मुव्हमेंटम २०२६’चे आयोजन करण्यात आले.

## "अंधेरी पोलीस ठाण्यात पोलीस बांधवांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर"

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, जिल्हा प्रतिनिधी प्रमुख मुंबई, प्रतिनिधी :**"जो करतो खाकीचा मान, त्यांचाच करतो आम्ही सन्मान" हे ब्रीदवाक्य जपत पोलीस जाणीव सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने अंधेरी पोलीस ठाणे (अंधेरी पूर्व) येथे पोलीस बांधवांसाठी मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पार पडलेल्या या शिबिराला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



तारा नेत्रालय, मुंबई यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये अत्याधुनिक उपकरणांच्या साहाय्याने पोलीस कर्मचाऱ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान गरजू लाभार्थ्यांची निवड करून त्यांना नि:शुल्क मोतिबिंदू शस्त्रक्रिया, मोफत चष्मे तसेच आयड्रॉप्सचे वितरण करण्यात आले. याशिवाय डोळ्यांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन करून योग्य उपचाराबाबत माहिती देण्यात आली.

दिवस-रात्र जनतेच्या सुरक्षेसाठी कार्यरत असणाऱ्या पोलीस बांधवांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. पोलीस कर्मचाऱ्यांच्या दृष्टीआरोग्याबाबत जनजागृती निर्माण करण्यासोबतच त्यांना आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

हा उपक्रम पोलीस जाणीव सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष रविसर फडणीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख संजय शेकोकार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शाखा क्रमांक ८६ चे अध्यक्ष मोहन गणपत कांगणे, अनिल देसाई, दादा फोटोग्राफर आणि सल्लागार संतोष गव्हाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी अंधेरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश मच्छिंद्र, पोलीस निरीक्षक विनोद पाटील, अविनाश येवला, सतीश कावनकर व अदलिंग यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच समाजसेवक हेमंत जैन, राजू जाधव, ‘पोलीस तपास’च्या मुख्य संपादक मंगला नलावडे, दीपक कोठळकर, विलास सुर्वे, कुमार रोहित मोरे, मोहम्मद आलम सलमान, प्रमोद सावंत, बिपीन शिंदे, विजय केळकर, मोहम्मद इंतखाब फारूखशी, कृष्णा अंबेकर, अनिल जाधव, सुधीर धोत्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आयोजकांचे आभार मानत अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे स्वागत केले. पोलीस बांधवांच्या आरोग्य संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या या शिबिराचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

## "बदलत्या काळातील पालकत्व" या विषयावर बालरोग संघटनेतर्फे पालक शिक्षकांकरिता विशेष चर्चा सत्र

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** हल्ली झालेले शहरीकरण, औद्योगीकरण, जीवघेणी स्पर्धा, समाज माध्यमांचा किशोरवयीन मुलांवर होणारा वाढता प्रभाव, त्याचे मुलांवर होणारे गंभीर दुष्परिणाम, मुलांमधील वाढलेली व्यसनाधीनता, वाढलेल्या वर्तन समस्या व हिंसाचार यामुळे पालक वर्ग थोडासा भांबावलेला आहे. या समस्या लक्षात घेऊन रायगड बालरोग संघटनेमार्फत "बदलत्या काळातील पालकत्व" या ज्वलंत, जिव्हाळ्याच्या आणि महत्त्वाच्या विषयावर शनिवार दि. 13 जून 2026 या दिवशी स. 11 ते 1 या दरम्यान एक विशेष परिसंवाद व चर्चासत्र आयोजित केले असून हे चर्चासत्र आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके या ठिकाणी होणार आहे.

या चर्चासत्राचे सूत्रसंचालन प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ, संवादक, वक्ते व लेखक डॉ. अमोल अन्नदाते करणार असून यात डॉ निशिकांत कोतवाल (नागपूर), डॉ. जयंत पांढरीकर (अमरावती) डॉ चंद्रशेखर दाभाडकर (महाड) डॉ सुचित तांबोळी (अहिल्यानगर) व डॉ. नीलिमा भांडारकर (पनवेल) हे या विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादानंतर ते शंका समाधान ही करणार आहेत. या चर्चासत्रात सर्व पालक व शिक्षकांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अधिवेशनाच्या मुख्य संयोजिका डॉ. चित्रा कुलकर्णी व या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. जय भांडारकर (88501 53158) यांनी केले आहे.

## २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करा

### अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे-पाटील यांचे पनवेल तालुक्यातील नागरिकांना आवाहन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : राज्यातील गरीब व गरजू कुटुंबांच्या निवासस्थानाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने २५ मार्च २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून १ जानेवारी २०११ पूर्वीची व सध्या अस्तित्वात असलेली निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र नागरिकांनी तात्काळ अर्ज दाखल करावेत, असे आवाहन पनवेलचे अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे- पाटील यांनी केले आहे.महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार बृहन्मुंबई वगळता राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व केवळ निवासी कारणासाठी वापरात असलेली अतिक्रमणे विशिष्ट अटी व शर्तींनुसार नियमित करण्यात येणार आहेत. यासाठी नागरिकांनी संबंधित ग्रामपंचायत अधिकारी अथवा ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावयाचे आहेत. अर्जासोबत मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कराची पावती, ग्रामपंचायतीचा ८-अ उतारा, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, उपग्रह छायाचित्र तसेच मागील एका वर्षातील रहिवासाचा शासकीय पुरावा जोडणे आवश्यक राहणार आहे. शासनाने अर्ज सादर करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदत दिली असून, या कालावधीत अर्ज करणाऱ्या पात्र व्यक्तींना त्यांचे अतिक्रमण नियमित होईपर्यंत संरक्षण मिळणार आहे.शासन निर्णयानुसार ५०० चौरस फूट क्षेत्रापर्यंतची निवासी अतिक्रमणे पूर्णपणे विनामूल्य नियमित करण्यात येणार आहेत. ५०० ते १५०० चौरस फूट क्षेत्रापर्यंतच्या अतिक्रमणांमध्ये पहिल्या ५०० चौरस फूट क्षेत्रासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. त्यापुढील क्षेत्रासाठी प्रचलित बाजारमूल्याच्या १० टक्के रक्कम आकारण्यात येईल. निवासी जागेचा काही भाग व्यावसायिक वापरात असल्यास संबंधित क्षेत्रासाठी बाजारमूल्याच्या २५ टक्के रक्कम आकारली जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र नागरिकांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दाखल करावेत, असे आवाहन अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे-पाटील यांनी केले आहे.

## यवतमाळच्या डॉ . सारिका शाह यांना नागपुरात प्रतिष्ठित 'विदर्भस्तरीय अहिंसा अवॉर्ड २०२६' प्रदान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** महावीर जयंतीच्या पावन पर्वावर सकल जैन समाज नागपूरच्या वतीने आयोजित सोहळ्यात यवतमाळच्या डॉ. सारिका महेश शाह यांना 'विदर्भस्तरीय अहिंसा अवॉर्ड २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. जैन समाजातील अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठित समजला जाणारा हा पुरस्कार यंदा 'सामाजिक क्षेत्रात' महिला विभागातून संपूर्ण विदर्भातून फक्त डॉ. सारिका शाह यांनाच मिळाला आहे.

या पुरस्कारासाठी संपूर्ण विदर्भातून ३०० पेक्षा जास्त अर्ज आणि फाईल्स आल्या होत्या. नागपूर जैन समितीच्या तज्ज्ञ चमूने डॉ. सारिका शाह यांनी वैद्यकीय क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेऊन त्यांची या सर्वोच्च पुरस्कारासाठी निवड केली. प्रत्येक कॅटेगरीमध्ये फक्त एकच अवॉर्ड दिला जात असल्याने हा सन्मान अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.



नागपूर येथील भव्य सुरेश भट ऑडिटोरियममध्ये महावीर जयंतीच्या दिवशी कोठारी ज्वेलर्स, नागपूर यांच्या सौजन्याने हा दिमाखदार सोहळा पार पडला. या प्रसंगी विदर्भातील जैन समाजाचे सर्व सदस्य आणि नागपूर जैन समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सारिका शाह या सध्या भारतीय जैन संघटना (BJS) यवतमाळच्या महिला अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत असून वैद्यकीय सेवेसोबतच समाजसेवा करणे हा त्यांचा छंद आहे. हा अत्यंत सन्माननीय पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. सारिका शाह यांच्यावर संपूर्ण विदर्भातून आणि यवतमाळ जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## रंजनी मदरशात रेल्वे सुरक्षा जनजागृती : उपनिरीक्षक विजय वाघ यांचा विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला

**दैनिक युवक आधार**

**रंजनी- परतूर (अशोक ठोके) :** रेल्वे प्रवाशांची सुरक्षा आणि रेल्वे मालमत्तेचे संरक्षण या हेतूने रेल्वे पोलिस बल, परतूर आउट पोस्टचे उपनिरीक्षक विजय वाघ यांनी आज रंजनी येथील मदरशातील विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रम घेतला. रंजनी रेल्वे स्टेशनला लागूनच असलेल्या मदरशात हा उपक्रम राबवण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद



साधताना उपनिरीक्षक विजय वाघ यांनी सांगितले की, "रेल्वेमध्ये कोणत्याही प्रकारचे ज्वलनशील पदार्थ वाहून नेऊ नयेत. अशा पदार्थांमुळे रेल्वेला आग लागण्याचा मोठा धोका असतो. तसेच चालत्या रेल्वेच्या डब्यांवर दगड मारू नयेत, कारण त्यामुळे प्रवाशांचा डोळा जाणे किंवा गंभीर दुखापत होण्याची शक्यता असते."असे कृत्य करणाऱ्या व्यक्तींवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल होतात आणि त्यामुळे त्यांचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते, अशी कडक समजही त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. "रेल्वेची सुरक्षा धोक्यात येईल असे कोणतेही कृत्य करू नका," असे आवाहन त्यांनी केले.या जनजागृती कार्यक्रमाला हेड कॉन्स्टेबल पी. बी. गायकवाड, कॉन्स्टेबल संदिप जाधव यांच्यासह मदरशाचे प्रिन्सिपल नईम सहाब कसमी, मौलाना मुस्ताकिम, कारी साईब, हाजी शकील आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी रेल्वे पोलिस बलाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. रेल्वे सुरक्षा बल परतूर कडून परिसरातील शाळा-महाविद्यालयांमध्ये अशा प्रकारचे जनजागृती कार्यक्रम सातत्याने राबवले जात आहेत.

## मुंबईतील दादर येथे प्लाझा चित्रपट गृहाबाहेर बेस्ट बसचा भीषण अपघात; दोन जण ठार; अनेक जण जखमी

**दैनिक युवक आधार**

**दादर प्रतिनिधी:- मयुर धुरी** : मुंबईतील दादर येथे प्लाझा चित्रपट गृहाबाहेर बेस्ट बसचा भीषण अपघात दोन जण जागीच ठार अनेक जण जखमी

मुंबईतील दादर परिसरातील प्लाझा थिएटरजवळ सोमवारी बेस्ट बसचा भीषण अपघात झाला. बस क्रमांक ४६३ ने नियंत्रण सुटल्याने तीन दुचाकी, एक टॅक्सी आणि एका ओला कॅबला जोरदार धडक दिली.

या अपघातात रस्त्यावरून जाणाऱ्या चार पादचाऱ्यांनाही बसची धडक बसली. या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून अन्य जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सोमवारी सकाळी सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला आहें.अपघातात मोटार सायकल सह काही चारचाकी गाडयांना बसची धडक बसली आहें. या अपघातामुळे प्रवाशामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहें. बेस्टच्या भाडेतत्त्वावरील बसचा प्रवास दिवसेंदिवस धोक्याचा होत आहें. गेल्या तीन वर्षांत ९५८ अपघातांपैकी ८५ टक्क्यांहून अधिक अपघात भाडे त्तवावरील झाले आहें. कंत्राटी चालकाच्या प्रशिक्षणावर प्रश्नचिन्ह उभा राहिला आहें. चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने रस्तात उभ्या असलेल्या जेसीबीवर बस आदळली आहें.

# उत्तर रायगड जिल्हा भाजप कार्यकारणीची मासिक बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्हा कार्यकारणीची मासिक बैठक भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज पनवेल येथे उत्साहात पार पडली. आगामी संघटनात्मक कार्यक्रम, जनसंपर्क अभियान तसेच विविध उपक्रमांच्या नियोजनाच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली.

यावेळी व्यासपीठावर भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस तथा महापौर नितीन पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल महापालिका सभागृहनेते व जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रिया मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, अनुसूचित जमाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सिताराम चौधरी, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सागर सांगडे, खोपोली उपनगराध्यक्ष विक्रम साबळे ओबीसी सेल अध्यक्ष राजेश भगत आदी उपस्थित होते. बैठकीला जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी, विविध सेल व मोर्चांचे अध्यक्ष, मंडल अध्यक्ष उपस्थित होते.

या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रातील सरकारच्या १२ वर्षपूर्ती निमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध जनजागृती व जनसंपर्क कार्यक्रमांचे नियोजन करण्यात




आले. केंद्र सरकारने गेल्या १२ वर्षांत देशाच्या विकासासाठी, पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी, गरीब कल्याणासाठी, महिला सक्षमीकरणासाठी तसेच आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. तसेच वृक्षारोपण अभियान, आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम प्रत्येक मंडल स्तरावर प्रभावी नियोजन करून कार्यक्रम यशस्वी करण्याचे निर्देश देण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाच्या विचारधारेचा प्रसार करताना केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक सक्रियपणे काम करावे, असे आवाहन केले. जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आगामी काळातील संघटनात्मक कार्यक्रमांची रूपरेषा मांडत सर्व पदाधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयातून पक्षाची ताकद अधिक वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. प्रत्येक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नियोजनबद्ध कामकाज, कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग आणि जनतेशी सातत्यपूर्ण संपर्क यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# खतांच्या योग्य नियोजनासाठी व पारदर्शक वितरणासाठी मोबाईल ॲप आवश्यक !!

## गर्दी आणि वादविवाद टाळण्यासाठी उपाययोजना आवश्यक !!

**दैनिक युवक आधार**

**अकोला दिलीप कराळे प्रतिनिधी** : दरवर्षी ऐन हंगामात रासायनिक खतांचा तुटवडा असतो,त्यातच लिंकिंग आणि खताचा काळाबाजार यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते. या सर्व समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आणि शेतकऱ्यांना वेळेवर खते उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने एक हक्काचे 'मोबाईल ॲप्लिकेशन' विकसित करावे, अशी आग्रही मागणी आता शेतकरी वर्गातून केली जात आहे.

या ॲपच्या माध्यमातून घरबसल्या खतांची बुकिंग करण्याची सुविधा मिळाल्यास शेतकऱ्यांना खतांसाठी दुकानांसमोर तासनतास रांगेत उभे राहावे लागणार नाही.

सध्या खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना कृषी सेवा केंद्रांवर प्रत्यक्ष जावे लागते. अनेकदा खते उपलब्ध असूनही काही व्यापाऱ्यांकडून कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते किंवा खतांसोबत इतर अनावश्यक मायक्रोन्युट्रिएंट्स




(लिंकिंग) घेण्याची सक्ती केली जाते. त्यातच शेतकरी आणि व्यापारी यांच्या वादविवाद होताना दिसतात. हे सर्व टाळायचे असल्यास सरकारने अधिकृत मोबाईल ॲप आणले, तर पारदर्शकता येईल कोणत्या दुकानात, कोणत्या कंपनीचे, किती खत उपलब्ध आहे याची अचूक माहिती थेट मोबाईलवर दिसेल.

खतांचे दर आणि साठा ऑनलाईन उपलब्ध असल्यामुळे व्यापाऱ्यांना चढ्या दराने खत विकता येणार नाही. परिणामी पारदर्शकता वाढेल.

या प्रस्तावित ॲपमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या सातबारा आणि आधार कार्डच्या आधारे नोंदणी केल्यास, त्यांच्या जमिनीच्या गरजेनुसार किती खत हवे आहे, याचे बुकिंग करता येऊ शकते. यामुळे डिजिटल पेमेंट करून किंवा दुकानात जाऊन पैसे देऊन थेट खत उचलणे शक्य होईल.त्यामुळे दुकानासमोर होणारी गर्दी टाळता येईल.

आज डिजिटल इंडियाच्या काळात देशातील लहानांत लहान शेतकरीही स्मार्टफोन वापरत आहे. पीएम किसान सन्मान निधी असो की पीक विमा, सर्व गोष्टी ऑनलाईन होत आहेत. याच धर्तीवर जर खत वितरण प्रणाली सुद्धा ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन केली, तर खतांचा काळाबाजार पूर्णपणे मोडीत




निघेल.पारदर्शकता वाढेल, शेतकऱ्यांना तासनतास कृषी केंद्रावर बसून राहायची वेळ येणार नाही, शेतकरी आणि व्यापारी यांच्यात होणारे वादविवाद टाळल्या जातील,शेतकऱ्यांचा त्रास पण वाचेल.

आता यावर सरकार सकारात्मक पाऊल उचलून आगामी हंगामापूर्वी असे एखादे डिजिटल व्यासपीठ शेतकऱ्यांसाठी लवकर उपलब्ध करून देणार का, याकडे संपूर्ण शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

पाऊस कधी पडेल याचा नेम नसतो, त्यात पाऊस पडल्यावर खत मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना शेतीची कामे सोडून दिवसभर कृषी सेवा केंद्रांसमोर रांगेत उभे राहावे लागते. जर मोबाईलवरूनच खतांचे बुकिंग झाले, तर थेट दुकानात जाऊन शेतकऱ्यांना आपला कोटा आणणे सोपे होईल.

# टेनिस क्रिकेटच्या प्रसारासाठी विभागीय पदाधिकाऱ्यांची निवड

## आष्टी येथे राज्यस्तरीय वार्षिक सहविचार सभा उत्साहात संपन्न!

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र राज्याची वार्षिक सर्वसाधारण व सहविचार सभा बीड जिल्ह्यातील आष्टी येथे मा. आमदार सुरेशजी (अण्णा) धस साहेब यांच्या जनसंपर्क कार्यालयात अत्यंत यशस्वी आणि उत्साही वातावरणात पार पडली. टेनिस क्रिकेट खेळाचा तळागाळापर्यंत विस्तार करणे आणि आगामी स्पर्धांचे अचूक नियोजन करणे हा या सभेचा मुख्य उद्देश होता.या सभेला प्रमुख अतिथी म्हणून आमदार सुरेश अण्णा धस उपस्थित होते, तर अध्यक्षस्थान भारतीय व महाराष्ट्र टेनिस क्रिकेटच्या सचिव मीनाक्षी गिरी यांनी भूषवले. या प्रसंगी विलास गिरी, घनश्याम सानप, चंद्रकांत तोरणे, विलास गायकवाड, बीड जिल्हा सचिव सुनील तांबे, आणि जिल्हा उपाध्यक्ष अविनाश कुमकर आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

**नवीन नियम आणि स्पर्धांचे नियोजन**

सभेमध्ये मार्गदर्शन करताना महाराष्ट्र सचिव मीनाक्षी गिरी यांनी सर्व जिल्हा सचिवांना टेनिस क्रिकेटमधील नवीन नियमांची सविस्तर माहिती दिली. तसेच, आगामी काळातील वार्षिक टेनिस क्रिकेट स्पर्धांचे भव्य नियोजन कसे असावे, यावरही सर्व पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.



**नवनियुक्त विभागीय पदाधिकारी (महाराष्ट्र राज्य)**

टेनिस क्रिकेटचा प्रचार आणि प्रसार राज्यभरात प्रभावीपणे व्हावा, यासाठी या सभेत विविध विभागांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली:

नाशिक विभाग: विलास गायकवाड (अध्यक्ष), संदिप शिंदे (सचिव) पुणे विभाग: घनश्याम सानप (अध्यक्ष) मुंबई विभाग: स्वप्निल सर (अध्यक्ष), संदीप पाटील (सचिव),छत्रपती संभाजीनगर विभाग: मुजीब शेख (अध्यक्ष), शेख शफी (सचिव)

अमरावती विभाग: गोवर्धन राठोड (अध्यक्ष), नितीन श्रॉफ (सचिव),कोल्हापूर विभाग: सिद्धेश गुरव (अध्यक्ष), कुणाल हरदालकर (सचिव) तसेच

आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकलेले खेळाडू धनश्री गिरी व दर्शन थोरात यांची महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या 'सदस्य पदी' निवड करून त्यांच्यावर नवीन जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

**नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन व शुभेच्छा**

पुणे जिल्हा सचिव केतन भापकर, नागपूर जिल्हा सचिव स्नेहल भगत, कोल्हापूर सचिव अजय सर्वोदय,रायगड सचिव स्वप्निल अडुरकर -, लातूर सचिव व्यंकट गिते,सोलापूर शहर संतोष लोकरे, सोलापूर ग्रामीण सोमनाथ पाटोळे या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्हा व विभागामध्ये टेनिस क्रिकेटचा जास्तीत जास्त प्रचार करावा आणि नवीन खेळाडूंना संधी द्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या निवडीबद्दल भारतीय टेनिस क्रिकेटचे संस्थापक (फाउंडर) कन्हैया गुजर, महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षा मयुरी गिरी, राज्य सचिव मीनाक्षी गिरी, विलास गिरी, धनु लोखंडे आणि विलास गायकवाड ,यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे जाहीर अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त जल्लोष

## चार दशकांच्या राजकीय प्रवासाचा भावनिक आढावा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर):** कोकण म्हाडाचे माजी सभापती तथा भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळा पनवेल येथील रॉयल गार्डनमध्ये मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीमुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाला आमदार विक्रांत पाटील, भाजपाचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, प्रीतम म्हात्रे, रमेश गुडेकर, रविशेठ पाटील, पनवेलचे प्रांताधिकारी पवन चांडक, ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, गणेश कोळी, भालचंद्र जुमालेदार यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून बाळासाहेब पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

सोहळयादरम्यान उपस्थित मान्यवरांनी बाळासाहेब पाटील यांच्या सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक कार्याचा गौरव केला. सामान्य कार्यकर्त्यापासून नेतृत्वाच्या प्रवासापर्यंत त्यांनी केलेल्या अथक परिश्रमांचा उल्लेख करत अनेकांनी त्यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. पक्ष संघटनेच्या बळकटीसाठी आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी त्यांनी




सातत्याने केलेल्या संघर्षाचीही यावेळी दखल घेण्यात आली.

आपल्या मनोगतात बाळासाहेब पाटील यांनी चार दशकांहून अधिक काळाच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासातील अनेक आठवणींना उजाळा दिला. पक्ष विस्तारासाठी काम करताना आलेली आव्हाने, संघर्षाचे दिवस, वरिष्ठ नेत्यांनी दाखवलेला विश्वास आणि सहकाऱ्यांनी दिलेली खंबीर साथ यांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. "संघटना उभी करताना अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले. मात्र पक्ष नेतृत्वाने ठेवलेला विश्वास आणि कार्यकर्त्यांनी दिलेली निस्वार्थ साथ यामुळे प्रत्येक जबाबदारी यशस्वीपणे पार पाडता आली," असे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना त्यांनी आपल्या यशाचे श्रेय कार्यकर्ते, सहकारी आणि जनतेला दिले. "गेली ४० वर्षे पक्षासाठी आणि समाजासाठी काम करण्याची संधी मला मिळाली. या काळात अनेक चढ-उतार अनुभवले, परंतु सहकाऱ्यांच्या पाठिंब्यामुळे प्रत्येक संकटावर मात करता आली. आज मागे वळून पाहताना केलेल्या कामाचा अभिमान वाटतो," अशा भावनिक शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.कार्यक्रमस्थळी कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव, सत्कार समारंभ आणि मान्यवरांच्या उपस्थितीमुळे रॉयल गार्डन परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. बाळासाहेब पाटील यांच्या दीर्घ सार्वजनिक जीवनातील योगदानाचा गौरव करणारा हा सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.


# शिवराज्याभिषेक ते सामाजिक न्याय : शिवराय आणि आंबेडकरी विचारांचा समान धागा

## ६ जून १६७४ ते ६ जून २०२६ :३५२ वर्षांच्या इतिहासाचे पुनर्वाचन

**दैनिक युवक आधार**

**रायगड प्रतिनिधी :-सचिन पवार** : ६ जून हा महाराष्ट्राच्या इतिहासातील केवळ एक स्मृतिदिन नाही, तर स्वाभिमान, प्रतिकार आणि लोककल्याणकारी शासनाच्या संकल्पनेचा उत्सव आहे. ६ जून १६७४ रोजी रायगडावर झालेला छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील एक क्रांतिकारी टप्पा ठरला.या घटनेने गुलामगिरी, परकीय वर्चस्व आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या जनतेला स्वराज्याची नवी दिशा दिली.आज, शिवराज्याभिषेकाला ३५२ वर्षे पूर्ण होत असताना,या घटनेचा आंबेडकरी समाजाच्या राजकीय आणि सामाजिक जाणिवांवर झालेला प्रभाव समजून घेणे आवश्यक आहे.शिवाजी महाराजांचे कार्य अनेकदा संकुचित धार्मिक किंवा जातीय चौकटीत मांडण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु इतिहासाचा सखोल अभ्यास केल्यास शिवरायांचे व्यक्तिमत्त्व हे त्यापेक्षा खूप व्यापक आणि लोकाभिमुख असल्याचे दिसून येते. त्यांच्या प्रशासनात विविध जाती, धर्म आणि सामाजिक घटकांना स्थान होते.

राज्यकारभारात गुणवत्ता, निष्ठा आणि कार्यक्षमता यांना महत्त्व देण्यात आले. ही बाब बहुजन समाजासाठी विशेष प्रेरणादायी ठरते.आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने शिवाजी महाराज हे केवळ एक शूर योद्धा नव्हते, तर अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारे आणि वंचित जनतेला सन्मानाचे स्थान देणारे शासक होते.डॉ. आंबेडकरांनी आपल्या प्रसिद्ध ग्रंथ Thoughts on Pakistan मध्ये शिवाजी महाराजांच्या नेतृत्वगुणांचा उल्लेख केला आहे. त्यांच्या मते, शिवाजी महाराजांनी अत्याचाराविरुद्ध संघर्ष करून स्वाभिमानाचे राज्य उभे केले. बाबासाहेब आंबेडकरांनीही शिवाजी महाराजांविषयी आदर व्यक्त केला होता. त्यांच्या दृष्टीने शिवाजी महाराज हे लोककल्याणकारी आणि न्यायप्रिय राजसत्तेचे प्रतीक होते. शिवराय आणि बाबासाहेब यांच्यात काळाचे अंतर असले तरी त्यांच्या संघर्षाचा मूलभूत हेतू समान होता. शिवाजी महाराजांनी राजकीय गुलामीविरुद्ध लढा दिला, तर बाबासाहेबांनी सामाजिक गुलामीविरुद्ध. शिवरायांनी स्वराज्याची स्थापना केली; बाबासाहेबांनी त्या स्वराज्याला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि संविधानिक न्यायाचे अधिष्ठान दिले.आजच्या काळात शिवाजी महाराजांच्या नावाचा राजकीय वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. परंतु त्यांच्या विचारांतील लोककल्याण, सामाजिक समावेशकता आणि न्यायव्यवस्थेची मूल्ये अनेकदा दुर्लक्षित राहतात. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांचे विचार केवळ जयंती आणि घोषणांपुरते मर्यादित ठेवण्याचाही प्रयत्न होतो. प्रत्यक्षात या दोन्ही महापुरुषांच्या विचारांचा संगम महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहे.



आंबेडकरी समाजासाठी शिवराज्याभिषेक हा केवळ ऐतिहासिक अभिमानाचा विषय नाही; तो स्वाभिमान, संघर्ष आणि परिवर्तनाची प्रेरणा आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या संकल्पनेतून राजकीय सक्षमीकरणाचा संदेश मिळतो, तर बाबासाहेबांच्या विचारांतून सामाजिक लोकशाहीचा मार्ग सापडतो.

म्हणूनच ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त महाराष्ट्राने केवळ इतिहासाचे गौरवगान न करता त्या इतिहासातील परिवर्तनवादी मूल्यांचा स्वीकार करणे गरजेचे आहे. कारण शिवरायांचा वारसा आणि बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान यांचा संगमच खऱ्या अर्थाने समतामूलक, न्यायनिष्ठ आणि प्रगत महाराष्ट्र घडवू शकतो.

बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीने शिवाजी महाराज हे केवळ एका राज्याचे राजा नव्हते; ते स्वाभिमान, प्रतिकार आणि लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेचे ऐतिहासिक प्रतीक होते." शिवरायांनी स्वराज्याचा दीप प्रज्वलित केला; बाबासाहेबांनी त्याला सामाजिक न्यायाचे तेज दिले. महाराष्ट्राच्या भविष्याचा मार्ग याच दोन महान परंपरांच्या संगमातून उजळणार आहे.

**जय भीम!**
**जय महाराष्ट्र!**
**अविनाश जाधव**
**सामाजिक कार्यकर्ते**
**#9130535015**

# अधिकमासानिमित्त मुडाणा येथे रस, पोळी व धोंडजेवणाचा कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**महागाव एम डी सूरोशे** : अधिक मासानिमित्त श्रीसंत एकनाथ महाराजांच्या कृपेने मुडाणा येथील निजधाम आश्रमात ९ जून रोजी रस, पोळी व धोंडजेवणाचा धार्मिक व सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सर्वगावकरी मंडळी उटी व मुडाणा यांच्या वतीने

करण्यात आले असून भाविक भक्तांसाठीमहाप्रसादाचे आयोजन करण्यात आले

आहे. या कार्यक्रमास गुरुवर्य तानाजी बापू यांच्या मार्गदर्शनाखालीविशेष स्वरूप प्राप्त झाले आहे. सकाळी १०.३० वाजल्यापासूनते दुपारी ४ वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालणार असून भाविकांनीमोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असेआवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक मास हाधार्मिकदृष्ट्या अत्यंत पवित्र मानला जात असल्याने या कालावधीतविविध धार्मिक उपक्रम, अन्नदान व सत्संगाचे आयोजन केलेजाते. त्याच अनुषंगाने मुडाणा येथील निजधाम आश्रमात होणारा हाकार्यक्रम भक्तांसाठी आध्यात्मिक समाधान व सामाजिक एकोपा

वाढविणारा ठरणार आहे. कार्यक्रम स्थळ निजधाम आश्रम, मुडाणावेळ सकाळी १०.३० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत या



कार्यक्रमासाठीपरिसरातील भाविक व ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती राहण्याचे आवाहननिजधाम आश्रम शाळेचे अध्यक्ष परसराम वानखेडे यांनी केले आहे.

# कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या सेवेसाठी प्रभाकर जोशी दाम्पत्याचा इस्कॉनतर्फे सन्मान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** समाजसेवा आणि मानवतेच्या कार्यात सातत्याने योगदान देणाऱ्या शुभम सामाजिक सेवाभावी संस्था, खारघरचे संस्थापक प्रभाकर जोशी आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सुजाता जोशी यांचा इस्कॉन खारघर मंदिराच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

खारघर येथील इस्कॉन मंदिरात कर्करोगग्रस्त रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सर्वांगीण कल्याणासाठी सुरू करण्यात आलेल्या 'होलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीट' आणि 'कृष्णा संजीवनी द डिव्हाईन म्युझिक' या उपक्रमांतर्गत नुकताच झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल जिष्णू देव वर्मा, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी






खासदार डॉ. सुनील गायकवाड, इस्कॉन नवी मुंबईचे मंदिर अध्यक्ष डॉ. सूर दास, भक्तिवेदांत कॉलेजचे संचालक डॉ. व्ही. सेवक दास, कॅल्विन सेउंगवॉन यी, जिल्हाधिकारी किशन जावळे, आयुक्त मंगेश चितळे, डॉ. विक्रम गोटा, डॉ. अमित जोशी, डॉ. रजनीश कामत, डॉ. अविनाश टिप्पणी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात जोशी दाम्पत्याचा सत्कार करण्यात आला.

प्रभाकर जोशी आणि सुजाता जोशी हे दाम्पत्य गेल्या अनेक वर्षांपासून शुभम सामाजिक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून कॅन्सरग्रस्त रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करत आहे. रुग्णांना उपचार प्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन, टाटा कँसर मेमोरिअल हॉस्पिटल येथे फाईल तयार करून देणे, विविध शासकीय व सामाजिक योजनांची माहिती उपलब्ध करून देणे तसेच रुग्णांच्या नातेवाईकांच्या राहण्याची व्यवस्था करण्यासाठी मदत करणे अशी अनेक समाजोपयोगी कामे संस्थेमार्फत केली जातात.याशिवाय ग्रामीण भागातील विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न, गरजू युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे यामुळे संस्थेने समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. जोशी दाम्पत्याच्या या उल्लेखनीय सेवाकार्याची दखल घेत खारघर इस्कॉन मंदिराच्या विश्वस्त मंडळाने त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत समाजसेवेची ही प्रेरणादायी वाटचाल भविष्यातही अशीच सुरू राहो, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या. या सन्मानामुळे शुभम सामाजिक सेवाभावी संस्थेच्या कार्याला अधिक बळ मिळणार असून समाजातील गरजू घटकांसाठी संस्था भविष्यातही अधिक जोमाने कार्यरत राहील, असा विश्वास प्रभाकर जोशी यांनी दिला.

# २ हजार महिलांच्या १.३९ कोटींच्या कथित फसवणुकीने खळबळ

## दिव्यज्योतच्या अध्यक्षा सुनीता कांबळे अटकेत

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** : बचत गटातील महिलांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याच्या प्रकरणात दिव्यज्योत संस्थेच्या अध्यक्षा सुनीता संतोष कांबळे यांना अटक करण्यात आली आहे. त्यांना रविवार (दि. ७ जून) रोजी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दि. ११ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

लासलगाव व परिसरातील महिलांना शिवणकाम व ब्युटी पार्लर प्रशिक्षणाच्या माध्यमातून शासकीय योजनांतून शिलाई मशीन, पिठाची गिरणी तसेच वॉशिंग मशीन मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या योजनांचा लाभ मिळणार असल्याच्या विश्वासावर विविध बचत गटांतील महिलांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम जमा करण्यात आल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी दिव्यज्योत संस्थेचे सचिव, संचालक आणि एजंट यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) तसेच ठेवीदारांचे हितसंरक्षण कायदा कलम ३ व ४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वीच या गुन्ह्यातील संशयित संजय बोराळे आणि जयश्री बोराळे यांचे अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळले आहेत.

तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील यांनी आरोपींना निफाड येथील जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले. प्राथमिक तपासात सुमारे २ हजार महिलांची तब्बल १ कोटी ३९ लाख ५१ हजार ९०० रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून फसवणुकीची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता तपास यंत्रणा पडताळून पाहत आहे.सरकार पक्षातर्फे सहायक जिल्हा सरकारी वकील ॲड. रामनाथ शिंदे यांनी युक्तिवाद करताना, आरोपी या संस्थेच्या अध्यक्षा असल्याने आर्थिक व्यवहारांची महत्त्वाची माहिती त्यांच्याकडून मिळू शकते तसेच इतर फरार आरोपींचा शोध घेणे आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर न्यायालयाने सुनीता कांबळे यांना दि. ११ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# लासलगावात जागतिक सायकल दिन उत्साहात; पोलीस स्टेशन व सायकलिस्ट मॉर्निंग ग्रुपची जनजागृती रॅली

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** : जागतिक सायकल दिनानिमित्त लासलगाव पोलीस स्टेशन व लासलगाव सायकलिस्ट मॉर्निंग ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. लासलगाव पोलीस स्टेशन ते मंजुळा मंगल कार्यालय पॅलेसपर्यंत काढण्यात आलेल्या या रॅलीद्वारे आरोग्य, तंदुरुस्ती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.दरवर्षी ३ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक सायकल दिनाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. सायकल हे स्वस्त, सुरक्षित, विश्वासार्ह आणि पर्यावरणपूरक वाहतूक साधन असून नियमित सायकलिंगमुळे शारीरिक तंदुरुस्ती राखण्यास मदत होते. तसेच हृदयरोग, मधुमेह यांसारख्या आजारांचा धोका कमी करण्यासही सायकलिंग उपयुक्त ठरते.




यावेळी नागरिकांना आठवड्यातून किमान एक दिवस सायकलचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. वाढते प्रदूषण आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी सायकलचा वापर प्रभावी पर्याय असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील व पोलीस निरीक्षक किरण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत लासलगाव सायकलिस्ट मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, विविध गावांतील पोलीस पाटील, महाविद्यालयीन विद्यार्थी, पत्रकार बांधव तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमामुळे सायकलिंगबाबत जनजागृती होऊन आरोग्यदायी व पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचला.

# वाहतूक पोलिस शाखेकडून कळंबोलीत ४५ वृक्षांचे रोपण




**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** कळंबोली वाहतूक शाखेच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कळंबोली परिसरात ४५ वृक्षांची लागवड करण्यात आली. बदाम, तह, नारक, आवळा, लिंब, करंज, अशोक, चाफा आणि पिंपळ या विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करून हरित परिसर निर्मितीचा संकल्प करण्यात आला.वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि झपाल्चाने कमी होत असलेले हरित क्षेत्र यामुळे पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक पर्यावरण दिनानिमित कळंबोली वाहतूक शाखेच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, कळंबोली परिसरातील निवडक ठिकाणी एकूण ४५ वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमात कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक पांडुरंग साठे, वाहतूक शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला,

# उकाड्यापासून दिलासा शोधण्यासाठी रेवदंडा बीचवर पर्यटकांची उसळली गर्दी; फेसाळणाऱ्या लाटांमध्ये समुद्रस्नानाचा मनसोक्त आनंद

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग निलेश फुंडे /रेवदंडा प्रतिनिधी** : अलिबाग तालुक्याच्या पर्यटन वैभवात मानाचा तुरा ठरलेल्या रेवदंडा समुद्रकिनाऱ्यावर जून महिन्याच्या पहिल्याच विकेंडला पर्यटकांची अक्षरशः झुंबड उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. वाढत्या उष्णतेने हैराण झालेल्या पर्यटकांनी रविवारी सकाळपासूनच रेवदंडा बीचकडे धाव घेत समुद्राच्या थंडगार पाण्यात डुंबण्याचा आणि फेसाळणाऱ्या लाटांशी खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटला.एका बाजूला अथांग निळाशार अरबी समुद्र, किनाऱ्यावर पसरलेली रुपेरी वाळू, किनाऱ्यालगत हिरवीगार शाल पांघरल्यासारखी डोलणारी नारळी-पोफळीची बाग आणि समुद्राच्या लाटांचा मनमोहक गजर अशा निसर्गरम्य वातावरणामुळे रेवदंडा बीच पर्यटकांसाठी आकर्षणाचे प्रमुख केंद्र बनला आहे.



उन्हाच्या झळांनी त्रस्त झालेल्या पर्यटकांना येथे येताच समुद्राच्या गारव्याचा सुखद अनुभव मिळत असल्याने बीचवर दिवसभर उत्साहाचे वातावरण होते.समुद्रात उसळणाऱ्या लाटांमध्ये युवक, युवती, कुटुंबीय आणि लहान मुले जलक्रीडांचा आनंद घेताना दिसत होते. किनाऱ्यावर उपलब्ध असलेल्या स्पीडबोट, बनाना राईड, बम्पर राईड, तसेच घोडा आणि उंट सफरींमुळे पर्यटकांचा उत्साह अधिकच वाढला होता. अनेकांनी समुद्रकिनाऱ्यावर छायाचित्रे आणि सेल्फी काढत आठवणी जपल्या, तर काहींनी समुद्राच्या सान्निध्यात निवांत क्षण घालवत निसर्गसौंदर्याचा आस्वाद

> **"रेवदंडा बीच म्हणजे समुद्र, निसर्ग आणि शांततेचा अद्भुत संगम. हिरव्यागार नारळी-पोफळीच्या बागांनी वेढलेला हा समुद्रकिनारा पर्यटकांना प्रत्येक ऋतूमध्ये वेगळा आणि अविस्मरणीय अनुभव देत असतो."**

घेतला.रेवदंडा बीचच्या परिसरात स्थानिक व्यावसायिकांकडून विविध खाद्यपदार्थ, चहा-नाश्ता, शीतपेये आणि समुद्री खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यात आली होती. पर्यटकांनी या खाद्यसंस्कृतीलाही भरभरून प्रतिसाद दिला. त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटल्याचे दिसून आले.शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी रेवदंडा बीचवर पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. यावेळीही किनाऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. काही काळ वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली होती. तरीही पर्यटकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून तसेच परदेशातूनही पर्यटक रेवदंडा बीचला भेट देत असल्याने या समुद्रकिनाऱ्याची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे.पावसाळ्याचे आगमन अद्याप झाले नसले तरी जून महिन्याच्या पहिल्या विकेंडला पडलेल्या कडक उन्हामुळे समुद्रकिनाऱ्यावर गर्दीचा उच्चांक पाहायला मिळाला. हिरव्यागार नारळी-पोफळीच्या बागांनी सजलेला, निसर्गसौंदर्याने नटलेला आणि फेसाळणाऱ्या लाटांच्या सहवासाने पर्यटकांना भुरळ घालणारा रेवदंडा बीच पुन्हा एकदा पर्यटनप्रेमींच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरल्याचे चित्र रविवारी पाहायला मिळाले.

# देश सेवेचा वारसा जपत माजी सैनिकाचा पाल्य नौदलात अधिकारी (सब-लेफ्टनंट म्हणून रुजू)

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :एझीमाला (केरला)** येथील इंडियन नेवल अकॅडमी मध्ये नुकत्याच पार पडलेल्या पास आऊट तसेच कमिशनिंग सोहळ्यात नागपूरच्या विक्रांत संजय जांभुळकर याला भारतीय नौदलात सब- लेफ्टनंट म्हणून नियुक्त करण्यात आले. विक्रांत याचे माध्यमिक शिक्षण स्टेट बोर्ड मधून तर उच्च माध्यमिक, सीबीएससी मधून



झाले. AI आणि Deta Science या विषयातून त्याने आपले बी. टेक. प्रियदर्शनी कॉलेज, हिंगणा येथून पूर्ण केले. चिकाटी, मेहनत आणि कौशल्य या बळावर त्याने हे नवीन शिखर गाठले. विक्रांत ची आई, पौर्णिमा जांभुळकर गृहिणी असून त्याच्या दोन्ही बहिणी डॉक्टर आहेत. वडील, संजय जांभुळकर हे माजी सैनिक असून यांनी आर्मी मध्ये EME corps ला 28 वर्ष देश सेवा देत Nb Sub या पदावरून निवृत्त झाले. विक्रांत हा आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत राष्ट्र सेवेत आपले योगदान देणार. या यशा प्रीत्यर्थ जांभुळकर परिवारांनी दिलेल्या छोटेखानी समारंभात देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करण्याच्या या महान कार्यात यश मिळो तसेच या अभिमानास्पद आणि धाडसी प्रवासासाठी समुद्राच्या लाटांप्रमाणे प्रशांत चे साहस ही अथांग राहो अशा शुभेच्छा देत आप्त तसेच कुटुंबीयांतर्फे त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला गेला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# परसोडीतील रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात ग्रामस्थांचे जाहीर आवाहन

## लोकवर्गणीतून रस्ता दुरुस्तीचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी स्वप्नील काटवले** : परसोडी गावातून ते असोली गावापर्यंत जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने अपघाताचा धोका वाढला असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. नुकत्याच झालेल्या एस.टी. बस अपघातात प्रवाशांना दुखापती झाल्याची घटना घडल्याने रस्त्याच्या प्रश्नाकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे.

शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. रस्त्याच्या खराब स्थितीमुळे शालेय विद्यार्थी, शेतकरी, वाहनचालक आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर गावातील नागरिकांनी एकत्र येत लोकवर्गणीतून रस्ता दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक कुटुंबाने आपल्या आर्थिक क्षमतेनुसार २, ४, १०, २० किंवा ५० रुपये अथवा त्यापेक्षा अधिक



योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जमा झालेल्या निधीतून रस्त्यावरील खड्डे बुजवून अपघात रोखण्याचा आणि नागरिकांची गैरसोय दूर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

"लोकप्रतिनिधी निवडून दिल्यानंतरही रस्त्याचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. त्यामुळे आता स्वतःच्या सुरक्षेसाठी आणि गावाच्या विकासासाठी ग्रामस्थांनीच पुढाकार घेण्याची वेळ आली आहे," असे आवाहन जाहीर पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य करावे आणि रस्ता दुरुस्तीच्या मोहिमेला हातभार लावावा, असे आवाहन परसोडी येथील नागरिकांनी केले आहे. "चला, आपल्या गावाची समस्या सोडवण्यासाठी एक पाऊल पुढे टाकूया," असा संदेशही या जाहीर आवाहनातून देण्यात आला आहे.

# केडिऐजीबी ग्रुप आणि ओरायन मॉलच्या रक्तदान शिबीराला ऊदंड प्रतिसाद; 205 पनवेलकरांनी केले रक्तदान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : ओरायन मॉल पनवेल येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. याचे ऊद्घाटन डॉक्टर निलेश बांठिया यांच्या हस्ते पार पडले. ऊद्घाटन प्रसंगी जेष्ठ डॉक्टर गिरीश गुणे आणि डॉक्टर ययाती गांधी उपस्थित होते. प्रसिद्ध ऊद्योगपती व केडिऐजीबी संस्थे चे अध्यक्ष मंगेश परुळेकर आणि उपाअध्यक्ष राजश्री नाईक यांनी सर्व मांन्यवरांचे स्वागत केले. या प्रसंगी रक्तदान शिबीराचे सहयोगी आय.डब्लुसी ग्यालेक्सी न्यु पनवेल चे प्रेसिडेंट भुमिका परमार व सेक्रेटरी दिपा आडमुठे या उपस्थित होत्या. डॉक्टर निलेश बांठिया यांनी स्वता रक्तदान करुन शिबीराचा शुभारंभ केला. या प्रसंगी बोलतांना डॉक्टर निलेश बांठिया यांनी रक्ताचा



तुटवडा असतांना रक्तदान शिबीर आयोजित केल्या बद्दल आयोजकांना धंन्यवाद दिले आणि जास्तीत जास्त लोकांनी या शिबारात रक्तदान करावे असे आहवान केले. डॉक्टर गिरीश गुणे यांनी ओरायन मॉल चे हे रक्तदान शिबीराचे तिसरे वर्ष आहे, ऐप्रिल, मे ला दर वर्षी रक्तदान शिबीरांचे आयोजन तुरळक प्रमाणात असल्या मुळे दर वर्षी या महिन्यात रक्ताचा तुटवडा असतो, या वर्षी आयोजकांनी २०० युनीट रक्ता संकलनाचे टारगेट ठेवले आहे त्याना शुभेच्छा देऊन लोकांनीही रक्तदान करावे असे अहवान केले. डॉक्टर ययाति गांधी यांनी आयोजकांचे अभिनंदन केले तसेच रक्त हे काही झाडावर येत नाही ऐखाद्या माणसाने रक्त दिले तरच ते दुसऱ्या गरजु माणसाला मिळु शकते यात प्रत्येकाने मला किंवा माझ्या आप्तांना कधीतरी रक्ताची गरज पडु शकते म्हणुन मी आज माझे रक्त देईन हा विचार करुन रक्तदान करावे असे आव्हान केले. एम.जी.एम हॉस्पिटल कामोठे रक्तपेढी चे प्रमुख राजेश अत्तरडे यांनी तुमच्या या आजच्या रक्तदान शिबीराला महत्व फार आहे कारण रक्ताच्या तुटवड्या मुळे आमच्या हॉस्पिटल मधे थ्यालासिमीया ची २२० मुले, हृदय शस्त्रक्रीया चे पेशंट रक्ता च्या वेटींग मधे आहेत , आजच्या रक्तदान शिबीरा मुळे गरजुं गरीबांना रक्त उपलब्ध होणार आहे, त्या बद्दल तुम्हाला धंन्यवाद द्यावे तेवढे कमीच आहेत असे सांगीतले रक्तदान शिबीराला ऊपस्थिती राहुन डॉक्टर भगवान बिरमुळे यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच मंडळाच्या कार्यकर्तानी दिलेल्या आग्रहाच्या आमंत्रण वरुन नगरसेविका सौ स्नेहल ढमाले ऊपस्थित राहिल्या मंगेश परुळेकर यांनी त्याचे स्वागत केले. पनवेल मधील व्यवसायिक प्रशांत पोद्दार व संजय पोद्दार तसेच मुंबई हुन गौडब्राम्हण संस्थे चे महेश रहाळकर, सिंधुदुर्ग मंडळ चे अध्यक्ष केशव राणे , प्रल्हाद साटम. ऍड नागेश हिरवे हे ऊपस्थित राहुन रक्तदान केले. होते. रक्तदान शिबीरा मध्ये २६० रक्तदात्यांनी भाग धेतला तरी प्रत्यक्ष २०५ रक्तदात्यांना रक्तदान करता आले. सदर रक्तदान शिबीराचे आय. डब्लुसी ग्यालेक्सी न्यु पनवेल यांच्या सहयोगाने आणि ऐम.जी. ऐम हॉस्पिटल कामोठे. यांच्या सहकार्याने पार पडले. अध्यक्ष मंगेश परुळेकर यांनी २०५ युनीट विक्रमी रक्तदाना बद्दल पनवेलकरांचे आभार मानले.

# जनगणना कार्यादरम्यान मृत्यू झालेल्या शिक्षकांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत व अनुकंपा नियुक्ती द्या

## टीचर्स डेमोक्रॅटिक फ्रंटची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका अमरावती, प्रतिनिधी** : महाराष्ट्रात आगामी जनगणना-२०२७ संदर्भातील विविध प्रशासकीय प्रक्रिया आणि क्षेत्रीय कामकाज वेगाने सुरू असून या राष्ट्रीय उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी संस्थांमधील शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पर्यवेक्षक व प्रगणक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हे कर्मचारी अत्यंत जबाबदारीने व प्रामाणिकपणे आपली कर्तव्ये बजावत असताना काही दुर्दैवी घटना घडल्या असून जनगणना कार्यादरम्यान राज्यातील काही शिक्षकांचा आकस्मिक मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

सध्या राज्यभर तीव्र उष्णतेची



परिस्थिती असून घराघरांत जाऊन माहिती संकलन, पडताळणी आणि इतर क्षेत्रीय कामकाज करताना संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात शारीरिक तसेच मानसिक ताण सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत कर्तव्य बजावत असताना मृत्यू झालेल्या शिक्षकांच्या कुटुंबांवर मोठे आर्थिक व सामाजिक संकट कोसळले असून त्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर टीचर्स डेमोक्रॅटिक फ्रंट, अमरावती विभागाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात जनगणना कार्यादरम्यान मृत्यू झालेल्या शिक्षकांच्या वारसांना प्रत्येकी एक कोटी रुपयांचे सानुग्रह आर्थिक सहाय्य देण्यात यावे, तसेच संबंधित कुटुंबातील पात्र सदस्यास अनुकंपा तत्त्वावर तात्काळ शासकीय सेवेत नियुक्ती देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

राष्ट्रीय कर्तव्य पार पाडताना प्राण गमावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून न्याय व आधार मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद करत, शासनाने या विषयाकडे मानवीय व संवेदनशील दृष्टिकोनातून पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे.

ही मागणी करणाऱ्यांमध्ये डॉ. पी. आर. राजपूत, डॉ. प्रशांत विघे, डॉ. प्रवीण बनसोड, सतीश मोरे, कैलास बाजड, शिवाजी तवर आणि मयूर देव्हाते यांचा समावेश आहे. जनगणना कार्यात योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याबरोबरच मृत शिक्षकांच्या कुटुंबियांना त्वरित मदत देण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

# उदासीन प्रशासनाविरोधात प्रहारचा एल्गार ; शेतकरी–शेतमजुरांच्या न्यायासाठी लढा

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी** : जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवरून प्रहार जनशक्ती पक्षाने आक्रमक भूमिका घेत प्रशासनाविरोधात एल्गार पुकारला आहे. भंडारा जिल्हा उपाध्यक्ष जयेंद्र देशपांडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तातडीने बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे. निवेदनात धान्य खरेदी केंद्रांवरील सुविधा, कामगार नोंदणी, ग्रामीण आरोग्य सेवा, लाखांदूर येथे ४०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, जंगली प्राण्यांमुळे होणारे पिकांचे नुकसान, तसेच पालांदूर येथील विविध शासकीय कार्यालये व रखडलेली विकासकामे सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रहारच्या मते, अनेकदा संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करूनही प्रश्न प्रलंबितच आहेत. शासनाच्या उदासीन धोरणामुळे शेतकरी व शेतमजूर आर्थिक संकटात सापडले असून जनतेमध्ये रोष वाढत आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक घेऊन सर्व



मागण्यांवर ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यासोबतच, मागण्यांवर लवकर निर्णय न झाल्यास प्रहारच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. तसेच आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील, असे स्पष्टपणे नमूद करून प्रहारने प्रशासनाला जागे होण्याचा इशारा दिला आहे.

शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्यांच्या न्यायासाठी सुरू झालेला हा लढा आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत असून प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे.

# पनवेल महापालिकेच्या 2026-27 अर्थसंकल्पातील कॉर्पोरेट निधीवर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : दिपक कोळवणकर** : पनवेल महानगरपालिकेच्या 2026-27 च्या अंदाजपत्रकात कॉर्पोरेट निधीसाठी केवळ ₹5 कोटींची तरतूद करण्यात आल्याचे समोर आले आहे. शहरात दूषित पाणी, खड्डेमय रस्ते, बंद पथदिवे, अपूर्ण गटारे आणि इतर मूलभूत सुविधांच्या समस्या कायम असताना विकासकामांसाठी एवढी मर्यादित तरतूद पुरेशी ठरणार का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महापालिकेच्या अर्थसंकल्पानुसार 2022-23 मध्ये कॉर्पोरेट निधीतून सुमारे ₹4.50 कोटी खर्च करण्यात आले होते. त्यानंतर 2023-24 आणि 2024-25 मध्ये खर्च अत्यल्प राहिल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे 2025-26 साठी सुरुवातीला ₹20 कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली होती. मात्र सुधारित अंदाजपत्रकात ती थेट ₹5 कोटींवर आणण्यात आली. 2026-27 साठीही पुन्हा ₹5 कोटींचीच तरतूद ठेवण्यात आली आहे.




कॉर्पोरेट निधी हा प्रत्यक्ष नगरसेवकांना दिला जाणारा निधी नसून महापालिकेच्या माध्यमातून विविध विकासकामांसाठी वापरला जातो. रस्ते, गटारे, पथदिवे, उद्याने, सार्वजनिक स्वच्छतागृहे, समाजमंदिरे आणि पाणीपुरवठा यांसारख्या कामांसाठी या निधीचा उपयोग केला जातो. मात्र या निधीतील किती रक्कम कोणत्या प्रभागासाठी खर्च होणार, कोणती कामे मंजूर आहेत आणि त्याचा लाभ नागरिकांना कसा मिळणार याबाबत अर्थसंकल्पात स्पष्ट माहिती उपलब्ध नाही.

नागरिकांनी प्रशासनाकडे खालील माहिती जाहीर करण्याची मागणी केली आहे :

- प्रभागनिहाय निधी वाटप
- कामनिहाय मंजूर रक्कम
- संबंधित ठेकेदारांची माहि ती
- कामांची मुदत व प्रगती अहवाल
- गुणवत्ता तपासणीचा तपशील

पनवेल शहरातील वाढत्या नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट निधीच्या खर्चात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत.

आगामी महासभेत या निधीच्या वापराबाबत सविस्तर चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे

# श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास प्रारंभ; भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : शहरातील मापारी गल्ली, जुना बाजारपट्टा येथे ८ जून ते १५ जून २०२६ या कालावधीत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यात भागवताचार्य ह.भ.प. श्री सुधन्वा महाराज केनेकर हे भागवत कथेचे निरूपण करणार आहेत.दररोज दुपारी १ ते ४ या वेळेत होणाऱ्या या कथा सोहळ्यात श्रीमद्भागवत महापुराणातील विविध प्रसंग, भक्ती, ज्ञान, वैराग्य तसेच समाजप्रबोधनपर




विचारांचे रसाळ विवेचन करण्यात येणार आहे. या माध्यमातून भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शन लाभणार असून भक्तिमय वातावरणात ज्ञानयज्ञाचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.या कथेचे यजमान नगरसेविका संध्याताई मापारी, समाज सेवक किशोर विनायक मापारी यांनी परिसरातील भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून भागवत कथेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी महामुनी अगस्ती महाराज वारकरी शिक्षण संस्था, सोयगाव यांचे विशेष सहकार्य लाभत आहे.धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा वारसा जपणाऱ्या या ज्ञानयज्ञ सोहळ्यामुळे सोयगाव परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# एसबीआय आरसिटी वाशिम येथे राष्ट्रीय पर्यावरण दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी रणजितसिह.ठाकुर** : स्टेट बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था वाशिम येथे राष्ट्रीय पर्यावरण दिन साजरा करत असताना लाभलेल्या प्रमुख अतिथी सौ.मंजुश्री जांभरुणकर मॅडम बालकल्याण विभाग वाशिम तसेच आदरणीय ढाले सर व स्टेट बँक ग्रामीण प्रशिक्षण संस्थेतील सर्व सर्व कार्यरत कर्मचारी वर्ग आणि संचालक आदरणीय धनाजी बोईले सर ,एसबीआयआरसिटी वाशिम च्या व्याख्याता वनिता सुभाष साबळे मॅडम तसेच ऑफिस असिस्टंट योगेश कुमार ठाकूर, तेजश्री निचडे मॅडम, ऑफिस स्टाफ महेंद्र सम्रत व महादेव भोयर, डीएसटी शिंदे मॅडम ,समीना मॅडम लोंढे मॅडम व ब्युटी पार्लर, महिला शिवणकाम ,आरी वर्क च्या सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी या उपक्रमासाठी हजर होत्या. यामध्ये मंजुश्री मॅडमने खूप मोलाचे मार्गदर्शन केले आहे . मॅडमच्या हस्ते एकूण पाच प्रकारचे झाडे लावण्यात आले. यामध्ये वडाचे, पिंपळाचे ,नारळाचे झाड लावण्यात आले .मंजुश्री मॅडम मार्गदर्शन करत असताना त्यांनी खूप उदाहरणे दिली पर्यावरणाचे संरक्षण करत असताना त्यांनी पाण्याचे संरक्षण करायचे तसेच पॉलिथिन बाहेर न फेकता तर डिझेल करण्यासाठी मशीन तयार करा असे पण उद्योजकांना सांगितले. तसेच झाडे तोडायला कधीही परवानगी देऊ नये असे ही आपल्या मनोबोधातून सांगितले. प्रत्येक रोडच्या साईडला जितके जास्तीत जास्त झाडे लावता येतील तितके लावण्याचा प्रयत्न करावा . पर्यावरणाचे संरक्षण करा नदीचे पाणी घाण करू नका ,म्हणजे त्यांनी हेही उदाहरण दिले आहे की मेलेल्या माणसाची राख जी आपण नदीत सोडतो ते नदीत न सोडता जर त्याला प्रत्येक















माणसाची ओळख म्हणून एक झाड लावले त्या राखेमध्ये तर माणूस जिवंतच राहतो .असे वेगवेगळे उदाहरणे देऊन प्रशिक्षणार्थ्यांना भावी उद्योजकांना पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी उद्युक्त केले .आदरणीय बाईले सरांनी पण पर्यावरणाचे संरक्षण करा .आपली पृथ्वी स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करा असे मोलाचे मार्गदर्शन प्रशिक्षणार्थ्यांना केले . मंजुश्री मॅडमने संपूर्ण एसबीआय आर सिटी चा परिसर बघितला असता त्यांनी प्रशिक्षण प्रशिक्षणार्थ्यांना भेट दिली असता त्यांना प्रशिक्षण खूप आवडले इतक्या सुविधा शासन अशा प्रशिक्षणार्थ्यांना देत आहे हे बघून त्यांनी एसबीआय आरसीटी ची खूप स्तुती केली आणि अशा प्रकारचे प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांना उद्युक्त करावे असे सर्व प्रशिक्षणार्थ्यांना सांगितले.

# शासनाची वाट नाही, कृतीची साथ! गल्ला वानखेडेंनी स्वखर्चातून वाचवला शहराचा हरित श्वास!

## स्वखर्चाने टँकरद्वारे पाणीपुरवठा; सुकणाऱ्या वृक्षांना दिले नवजीवन, युवा नगरसेवकाच्या कार्याची सर्वत्र चर्चा

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम,राजकारणात अनेकजण आश्वासनांचा पाऊस पाडतात, तर काहीजण केवळ घोषणांपुरते मर्यादित राहतात. मात्र प्रत्यक्ष कृतीतून लोकांच्या मनात घर करणारे लोकप्रतिनिधी फार कमी असतात. वाशिम शहरात सध्या असेच एक नाव सर्वत्र चर्चेत असून ते म्हणजे युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखेडे. शासनाच्या निधीची किंवा कोणत्याही योजनेची वाट न पाहता जिथे गरज दिसते, तिथे स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून काम उभे करण्याची त्यांची कार्यशैली नागरिकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे.

वाशिम नगरपरिषद कार्यालयासमोरील टेम्पल गार्डनमधील अनेक वृक्ष तीव्र उन्हामुळे व पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर होते. दिवसेंदिवस वाढणाऱ्या उष्णतेमुळे या झाडांचे अस्तित्व धोक्यात आले होते. ही परिस्थिती पाहून नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखेडे यांनी कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी किंवा औपचारिकता न करता थेट कृतीचा मार्ग स्वीकारला. त्यांनी स्वतःच्या खर्चातून टँकरची व्यवस्था करून झाडांना पाणीपुरवठा केला आणि सुकण्याच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या वृक्षांना नवजीवन दिले.

विशेष म्हणजे हा उपक्रम केवळ एका उद्यानापुरता मर्यादित नाही. शहरातील ज्या भागात पाण्याची कमतरता जाणवते, जिथे नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो किंवा ज्या ठिकाणी वृक्ष पाण्याअभावी करपत आहेत, त्या ठिकाणी गल्ला वानखेडे स्वतः पुढाकार घेऊन मोफत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे कार्य सातत्याने करत आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी केवळ आश्वासने दिली नाहीत, तर स्वतः मैदानात उतरून समस्यांवर उपाय शोधण्याचा आदर्श निर्माण केला आहे.

नगरसेवकपदाची धुरा





> **"झाडे ही आपल्या पुढील पिढ्यांसाठीची अमूल्य ठेव आहे. वृक्ष लावणे हा उत्सव असू शकतो, पण त्यांचे संगोपन करणे ही खरी सामाजिक जबाबदारी आहे. शहरातील एखादे झाड पाण्याअभावी सुकत असेल आणि आपण फक्त बघ्याची भूमिका घेत असू, तर ते पर्यावरणाप्रती अन्याय आहे. म्हणूनच जिथे गरज भासेल तिथे मी स्वतःच्या खर्चातून मदतीसाठी कायम उभा राहणार आहे. शहराचा हरित श्वास जपणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे."**
>
> **— सतीश उर्फ गल्ला वानखेडे, युवा नगरसेवक.**

सांभाळल्यानंतर गल्ला वानखेडे यांनी "समस्या दिसली की उपाय झाला पाहिजे" हा मंत्र स्वीकारला आहे. त्यामुळेच रस्ते, पाणी, स्वच्छता, सामाजिक उपक्रम आणि पर्यावरण संवर्धन अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांच्या कामांची चर्चा होताना दिसत आहे. अनेकदा शासकीय प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत नागरिकांना त्रास सहन करावा लागतो; मात्र गल्ला वानखेडे अशा परिस्थितीत विलंब न करता स्वतःच्या खर्चातून मदतीचा हात पुढे करतात. हीच त्यांची कार्यपद्धती त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवत आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या बाबतीतही त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय आहे. आज अनेक ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन होते, छायाचित्रे प्रसिद्ध होतात; परंतु झाडे जगविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे हात कमी पडतात. अशा परिस्थितीत उन्हाच्या कडाक्यात स्वतः उभे राहून झाडांना पाणी देणारा लोकप्रतिनिधी नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. कारण झाडे ही केवळ हिरवाई नसून भावी पिढ्यांच्या आरोग्याची, पर्यावरणाच्या संतुलनाची आणि जीवनाच्या शाश्वततेची हमी आहेत.गल्ला वानखेडे यांच्या या कृतीमुळे "झाडे लावणे महत्त्वाचे, पण ती जगविणे त्याहून महत्त्वाचे" हा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचला आहे. त्यांनी सुकणाऱ्या प्रत्येक वृक्षाकडे केवळ झाड म्हणून पाहिले नाही, तर शहराचा हरित श्वास म्हणून त्यांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

शहरातील नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करताना, विकास म्हणजे केवळ सिमेंट-काँक्रीटच्या रचना नसून पर्यावरण जपणे, पाणी वाचवणे आणि समाजाप्रती संवेदनशीलता राखणे हेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले. युवा पिढीने अशा कार्यातून प्रेरणा घेऊन सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवावी, असेही अनेकांनी नमूद केले.यावेळी राजू भोयर, महेश इंगळे, बालाजी ठेंगडे, ओमकार राऊत, ऋषी खरबळकर, प्रथमेश सुळे, महेश चव्हाण, निखिल नांदणकर, अमोल सुरोशे, वैभव खुळे, ज्ञानेश्वर मोपकर यांच्यासह असंख्य वृक्षप्रेमी उपस्थित होते.

# गडेगावात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात

## नवीन वन्यजीव कार्यालयाचे उद्घाटन, वृक्षारोपणासह सापांबाबत जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी स्वप्नील काटवले** : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून गडेगाव येथे नवीन राखीव वन्यजीव क्षेत्रीय कार्यालयाचे उद्घाटन, वृक्षारोपण आणि सापांबाबत जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




नवीन कार्यरत वन्यजीव वनक्षेत्राधिकारी अपेक्षा शेंडे, ग्रीन नेचर फाउंडेशन (ग्रीन फ्रेंड्स नेचर क्लब, लाखनी) चे कार्यवाह प्रा. अशोक गायधने, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भैय्याजी बावनकुळे, अशोक नंदेश्वर, सरीसृप संशोधक विवेक बावनकुळे, सर्पमित्र पंकज भिवगडे, सौरभ बोरकर, नितीन निर्वाण तसेच वनक्षेत्र सहाय्यक सुनील खांडेकर आणि वन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी वनक्षेत्राधिकारी अपेक्षा शेंडे यांनी गडेगाव येथील नवीन राखीव वन्यजीव क्षेत्रीय कार्यालय कार्यान्वित झाल्याची घोषणा केली. त्यानंतर 'एक पेड़ माँ के नाम' अभियानांतर्गत कार्यालय परिसरात विविध प्रजातींच्या ३५ वृक्षांचे रोपण करण्यात आले. वृक्षांचे संवर्धन व्हावे यासाठी काही रोपांना संरक्षक कठडेही बसविण्यात आले.

यानंतर ग्रीन नेचर फाउंडेशनच्या वतीने विषारी व बिनविषारी सापांचा परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रा. अशोक गायधने यांनी चार्ट व छायाचित्रांच्या माध्यमातून सापांबाबतची शास्त्रीय माहिती देत अनेक गैरसमज व अंधश्रद्धांचे निरसन केले. कार्यक्रमात सरीसृप संशोधक विवेक बावनकुळे तसेच सर्पमित्र पंकज भिवगडे, नितीन निर्वाण आणि सौरभ बोरकर यांनी सापांचे पर्यावरणीय महत्त्व, त्यांचे संरक्षण आणि साप आढळल्यास घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भैय्याजी बावनकुळे यांनी पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. वनक्षेत्राधिकारी अपेक्षा शेंडे, सहाय्यक वनक्षेत्र अधिकारी सुनील खांडेकर आणि अशोक नंदेश्वर यांनीही पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. अशोक गायधने यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहाय्यक वनक्षेत्र अधिकारी सुनील खांडेकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रीन नेचर फाउंडेशनचे कार्यकर्ते वंश फंदे, लक्की चांदेवार, महेश जाधव, आकाश खोजे, अश्विन वासनिक, नीलकमल तायडे, गजानन हात्ते, अमित कुंजाम, सुषमा कापगते, छाया लांजेवार तसेच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नांदुरा शहरात जीवनरंग संगीत सोहळा उत्साहात संपन्न !

**दैनिक युवक आधार**

**बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे** : खामगाव येथील जीवनरंग कराओके म्युझिकल ग्रुप यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य "जीवनरंग संगीत सोहळा" शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी नांदुरा शहरातील सिटी प्राईड सभागृहात मोठ्या उत्साहात व सुरेल वातावरणात संपन्न झाला. सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या संगीत महोत्सवाला बुलढाणा जिल्ह्यासह विविध भागांतील संगीतप्रेमी व हौशी कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता.

संगीत क्षेत्रातील नवोदित व हौशी कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात तब्बल ६९ गायक गायिकांनी सहभाग नोंदवून आपल्या गायनकलेचा उत्कृष्ट संगीतमय आविष्कार सादर केला.

कराओके शैलीत सादर करण्यात आलेल्या विविध जुन्या-नव्या सदाबहार गीतांनी उपस्थित रसिक बांधव व महिला, बालगोपाल सर्व मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाचा शुभारंभ प्रमुख अतिथी



अविनाश कुलकर्णी सर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आला. यानंतर त्यांनी प्रथम गीत सादर करून संगीत सोहळ्याची सुरेल सुरुवात केली. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमात सहभागी कलाकारांनी आपल्या सुमधुर आवाजाने वातावरण भारावून टाकले.या सोहळ्यात चंद्रपूर, अकोला, बाळापूर, भुसावळ, जामनेर, जळगाव जामोद, शेगाव, चिखली खामगाव, जलंब, मलकापूर, धामणगाव बढे, वाडी, गोंधनपूर, रोहणा आणि नांदुरा येथील नवोदित कलाकारांनी सहभाग घेत विविध हिंदी व मराठी चित्रपट गीतांचे आकर्षक सादरीकरण केले.

सुमारे ६९ गायक-गायिकांचा सहभाग हे कराओके गायनाविषयी वाढत असलेल्या आकर्षणाचे व लोकप्रियतेचे द्योतक असल्याचे चित्र या कार्यक्रमातून स्पष्टपणे दिसून आले. संगीत क्षेत्रातील नवोदित कलाकारांना आत्मविश्वास मिळवून देणारे हे व्यासपीठ ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जीवनरंग कराओके ग्रुपचे सदस्य लक्ष्मी शेजव, संतोष गवई सर, सिद्धार्थ धंदरे चिखली,संतोष साबळे सर, प्रेम पाटील, आनंद साबळे, अरुण सावंग (खामगाव), सुनील सावंग (रोहणा), मिलिंद डोंगरदिवे (खांडवी) तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी एम. एस. धंदरे यांनी विशेष परिश्रम घेतले.सुरेल गीतांचा वर्षाव, नवोदित कलाकारांना मिळालेले व्यासपीठ आणि रसिकांची उत्स्फूर्त उपस्थिती यामुळे हा "जीवनरंग संगीत सोहळा" नांदुरा शहरातील एक अविस्मरणीय सांस्कृतिक पर्व ठरला.

# स्वर्गीय रमाबाई मेश्राम यांना आदिवासी समाजातील सामाजिक कार्यकर्ते यांच्या कडून भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : स्वर्गीय रमाबाई मेश्राम यांच्या साठी शोकसभा म्हणून " भाव पुष्पांजली " कार्यक्रमाचे आयोजन आदिवासी समाजातील सामाजिक कार्यकर्ते, आणि ग्राम स्वराज्य महामंच चे संस्थापक अध्यक्ष, मा मधुसूदन कोवे गुरुजी यांनी आयोजन केले होते.* कुटुंबात दुःखत घटना घडणं. हे सांगुन येतं नाही. या दुःख घटना मध्ये सर्व नातेवाईक आणि समाज सहभागी होतात व आपल्या भावना व्यक्त करतात. या साठी मा डॉ विलास कनाके साहेब यांनी सुचविलेल्या प्रमाणे सौ माया मधुसूदन कोवे यांच्या मातोश्री स्वर्गवासी झाल्यात या वेदना दुःख त होत्या म्हणून या *भावपूर्ण पुष्पांजली* चा घेण्यासाठी गुरुदेव सेवा भजनी मंडळ वंजारी फैल यवतमाळ यांच्या *सुमरण भजन भाव पुष्पांजली* *कार्यक्रमाचे अध्यक्ष - मा डॉ विलास कनाके साहेब हे होते. तर प्रमुख अतिथी मान्यवर मा. प्रा. मनोहर मेश्राम मा मारोतराव पडाळ ( सेवा निवृत्त विस्तार अधिकारी ) मा नरेश गेडाम साहेब जिल्हा अध्यक्ष तथा आदिवासी विकास परीषद नई दिल्ली



केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा शैलेश गाडेकर, अध्यक्ष शामा दादा कोलाम बिग्रेड मा एकनाथ जी राऊत अध्यक्ष विश्वकर्मा गुरू देव सेवा मंडळ राळेगाव या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत " भाव पुष्पांजली " कार्यक्रम सुरू झाला. अतिशय भावनिक आणि सामाजिक विषयांवर संबोधन करताना मा नरेश जी गेडाम साहेब मनाले हा भाव पुष्पांजली कार्यक्रम आदिवासी समाजात सुरू करणारे पहिले व्यक्ती कोण असेल तर मा मधुसूदन कोवे गुरुजी हे होय. आमच्या आदिवासी समाजातील नेत्यांना सत्कार, सन्मान सोहळ्यात जाण्यासाठी पत्रिकेची आवश्यकता नाही. पण एखाद्या कुटुंबात दुःखत घटना घडली असेल तर यांना त्या कुटुंबातील लोकांच साधं सांत्वन करण्यासाठी वेळ मिळत नाही. हे आमच्या आदिवासी नेत्यांची सामाजिक बांधिलकी आहे.* *भावांनो समाजाच्या दुःखात सहभागी व्हा. असे स्पष्ट मत यांनी व्यक्त केले. सोबत सर्व सन्माननीय मंडळींनी आपल्या संवेदनशील शब्दातुन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. अध्यक्षीय भाषणात श्रध्दांजली अर्पण करताना डॉ विलास कनाके साहेब यांनी स्पष्ट केले की आपला समाज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त " पुष्पांजली " कार्यक्रम सहभागी होत असतात म्हणून मी माननीय मधुसूदन कोवे गुरुजी यांना एक शब्द सुचवला की आपल्या आदिवासी समाजात ही श्रध्दांजली कार्यक्रमांची प्रथा सुरू करावी. हा मानवतावादी सामाजिक उपक्रम आहे. जेणेकरून आपल्याला समाजातील दुःख त घटनेत सहभागी होता येईल. ते आपलं सामाजिक दायित्व राहील. असे स्पष्ट मत डॉ विलास कनाके साहेब यांनी व्यक्त केले होते.* *वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजन मंडळ पिंपळगाव आणि गुरुदेव सेवा भजनी मंडळ वंजारी फैल यवतमाळ यांनी " भाव पुष्पांजली " सुमरण जागृती कार्यक्रम केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा मधुसूदन कोवे गुरुजी यांनी केले. या भाव पुष्पांजली कार्यक्रम मध्ये सहभागी. आदिवासी समाजातील अनेक लोकांनी सहभाग नोंदविला होता.

प्रामुख्याने. अशोकराव मंगाम, दिलीपराव मेश्राम, रामकृष्ण सलामे अंकुश सोयाम ( तबला वादक ) गजानन पंधरे, गणेश कुडमथे सुशिला बाई सलाम, प्रल्हाद काळे, नितीन मेश्राम, बंडू पंधरे, अनेक मंडळी या " भाव पुष्पांजली " कार्यक्रमात सहभागी झाली होती. या कार्यक्रमाचे आभार कोवे परीवार आणि मेश्राम परीवार यांनी मानले आहे.*

# रायगड-रत्नागिरी-सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील निवडणूक

## विधानपरिषद सदस्यपदी अनिकेत तटकरे बिनविरोध




**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : रायगड-रत्नागिरी-सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात विधान परिषद सदस्यपदी अनिकेत सुनिल तटकरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी मनुज जिंदल यांनी आज त्यांना प्रमाणपत्र प्रदान केले.आहे यावेळी आमदार किरण सामंत, जिल्हा परिषद अध्यक्ष अस्मिता केंद्रे, उपाध्यक्ष विलास चाळके, ॲड बंटी वणजू आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. जिंदल यांनी पुष्पगुच्छ देवून विधानपरिषद सदस्य श्री. तटकरे यांचा यावेळी सत्कार केला.बिनविरोध निवड झाल्याने सुनील तटकरे यांनी पुन्हा एकदा आपले राजकीय अस्तित्व अजूनही बळकटअसल्याचे सिद्ध केले आहे. अनिकेत सुनिल तटकरे यांची बिनविरोध निवड झाल्या नंतर अनेक राजकीय नेत्यांनी.हितचिंतकांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करीतत्यांना शुभच्छा दिल्या

# कांदा खरेदीच्या नावाखाली शेतकऱ्यांची थट्टा? पहिल्याच दिवशी नाफेड केंद्रांवर शुकशुकाट

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** : राज्य शासन आणि केंद्र सरकारकडून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नाफेड व एनसीसीएफमार्फत कांदा खरेदी सुरू करण्याच्या घोषणा करण्यात आल्या. मात्र प्रत्यक्षात पहिल्याच दिवशी या घोषणांचा फुगा फुटल्याचे चित्र जिल्हाभरात पाहायला मिळाले. आशिया खंडातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीसह जिल्ह्यातील अनेक बाजार समित्यांमध्ये नाफेडचे अधिकारीच न फिरकल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत नाफेड व एनसीसीएफमार्फत तातडीने कांदा खरेदी सुरू करण्याचे आदेश




दिले होते. तसेच ३० जून २०२६ पर्यंत केंद्र शासनाने दिलेले खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर आजपासून खरेदी सुरू होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र प्रत्यक्षात खरेदी केंद्रांवर अधिकारीच अनुपस्थित असल्याचे चित्र समोर आल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दरम्यान, नाफेडने कांदा खरेदीसाठी प्रतिक्विंटल १,५८० रुपयांचा दर जाहीर केला आहे. दुसरीकडे लासलगावसह जिल्ह्यातील विविध बाजार समित्यांमध्ये कांद्याला १,६०० ते २,२०० रुपयांपर्यंत बाजारभाव मिळत आहे. अनेक ठिकाणी खुल्या बाजारात अधिक दर मिळत असल्याने नाफेडच्या केंद्रांकडे शेतकरी कितपत वळतील, याबाबतही साशंकता व्यक्त केली जात आहे.

एका बाजूला शासनाकडून खरेदी सुरू झाल्याच्या घोषणा केल्या जात आहेत, तर दुसऱ्या बाजूला खरेदी केंद्रांवर कोणतीही हालचाल नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये नाफेडची खरेदी नेमकी कधी सुरू होणार, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.

पहिल्याच दिवशी नाफेडची कांदा खरेदी ठप्प राहिल्याने सरकारच्या घोषणांमध्ये आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीत मोठी तफावत असल्याची चर्चा कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये सुरू असून, शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी त्यांच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच पडल्याची भावना व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्रात प्रथमच युवा प्रतिष्ठान रायगडच्या वतीने सामूहिक वृक्षारोपण अभियानाच्या लोगोचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे** : युवा प्रतिष्ठान रायगड च्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन पंतनगर घाटकोपर येथे करण्यात आले होते. त्याला उत्फूर्त प्रतिसाद मिळाला. ह्यावेळी पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून विचार करताना निसर्गाचा योग्य समतोल रहावा ह्यासाठी जजागृतीपर सामूहिक वृक्षारोपण अभियानाची संकल्पना मांडण्यात आली. त्या अनुषंगाने विविध गावात पर्यावरणपूरक जनजागृती व्हावी व निसर्गाचा ऱ्हास थांबवा म्हणून गावा गावात सामूहिक वृक्षारोपण अभियानातून झाडे लावून ती वाढवून पुढील पिढीस त्यांचा लाभ प्रोत्साहन आणि मार्गदर्शन ह्यासाठी हा उपक्रम संपन्न करण्याचा निर्धार करण्यात आला. व लोगोचे प्रकाशन करण्यात आले. हया प्रसंगी प्रतिष्ठानचे संस्थापक / अध्यक्ष - अमर खेरटकर, रक्तदान शिबिर अध्यक्ष - गणेश निर्मळ, उपाध्यक्ष - गणेश शिंदे, संघटक प्रमुख - मयूर शिगवण , संजय कोमनाक , सह संपर्कप्रमुख- निलेश बोर्ले, श्रीवर्धन संघटक प्रफुल तिलटकर संघटक अभय तिरटकर संघटक म्हसळा, संघटक -



विशाल सावंत विभाग संघटक विशेष सहकार्य निशांत शिगवण ,सल्लागार शैलेश पवार कार्यकारणी सदस्य शैलेश करडे सुनील वागजे गाव काळीज मुंबई अध्यक्ष प्रथमेश शिगवण गाव काळींजे खजिनदार दीपक ओमकार साहित्यिक लेखक विनोद विचारे, सुप्रसिद्ध समाजसेविका वर्षा चव्हाण प्रमुख उपस्थित होते.

हया लोगोची संकल्पना अंकुश रामचंद्र जोष्टे ठाणे यांनी मांडली व प्रत्यक्षात प्रसिद्ध केली. सर्वांनी सामुदायिक वृक्षारोपण अभियानचे आणि लोगोचे कौतुक केले.

## एनडीए' ची महत्त्वाची बैठक दिल्लीत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापन दिन ११ जून रोजी – सुनिल तटकरे

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधि -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एनडीए'ची बैठक दिल्ली येथे बुधवार दिनांक १० जून रोजी बोलावली असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचा २७ वा वर्धापन दिन गुरुवार दिनांक ११ जून रोजी दुपारी २ वाजता षण्मुखानंद सभागृहात आयोजित करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या बैठकीला देशभरातील 'एनडीए'चे घटक पक्ष आणि त्या घटक पक्षांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि काही सदस्य उपस्थित राहणार आहेत. त्या बैठकीला जाणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने मुख्यमंत्री यांच्यामार्फत आमच्या उपमुख्यमंत्री आदरणीय श्रीमती सुनेत्रावहिनी आणि मला बैठकीला उपस्थित राहणे महत्त्वाचे आहे असेही सुनिल तटकरे म्हणाले.

दोन वर्षापूर्वी जनतेने तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी आणि एनडीएला देशाची पुन्हा एकदा सेवा करण्याची संधी दिली. सलग तीन वेळा संधी मिळाल्यानंतर देशाची प्रगती... देशाचा विकास... जगभरात युध्दाचे सावट असताना देशाच्या प्रगतीत तितकीच केलेली वाढ अशा या दोन वर्षे पूर्ततेचा एक आढावा किंवा बैठक ही आहे असेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.

दादांच्या नेतृत्वाखाली आम्ही एनडीएमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आणि त्यानंतर लोकसभेच्या निवडणुकीनंतर एनडीएच्या बैठकीत सहभागी झालो होतो. अशावेळी नरेंद्र मोदींचा गौरव तर आहेच एनडीएच्या भक्कमपणाने... देशात एकसंघपणाने जी वाटचाल होतेय त्या कुशल पुढील वाटचालीचेसुध्दा त्या बैठकीत मंथन होऊ शकते हेही सुनिल तटकरे यांनी सांगितले.

त्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसचा २७ वा वर्धापन दिन हा गुरुवार दिनांक ११ जून रोजी दुपारी २ वाजता षण्मुखानंद सभागृहात म्हणजे जिथे नियोजित केला होता तिथेच फक्त तारखेमध्ये बदल करण्यात आला आहे. याची माहिती राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या माझ्या सर्व सहकाऱ्यांना कळावी म्हणून ही पत्रकार परिषद घेतल्याचे सुनिल तटकरे यांनी सांगितले.

दादांच्या दुर्दैवी निधनानंतर आम्ही वर्धापन दिन साजरा करत आहोत. अतिशय संयमाने... धिरोदत्तपणाने राष्ट्रीय अध्यक्षपदाची... उपमुख्यमंत्री पदाची सूत्रे सुनेत्रा वहिनींनी हाती घेतल्यानंतर या कालखंडात पक्षाची उभारणी सुरू आहे. सन २०२९ मध्ये एनडीए म्हणून आम्हाला सामोरे जायचे आहे. मधल्या कालावधीत काही जिल्हा परिषद निवडणूका झाल्या आणि अजून जिल्हा परिषदेच्या निवडणूका व्हायच्या आहेत. ५० टक्के आरक्षणाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयातून आल्यानंतर ऑक्टोबर - नोव्हेंबरकडे या निवडणूका होऊ शकतात. त्यामुळे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा वहिनींचा राज्यभरातील दौरा नियोजित करत आहोत. एसआयआरचा कार्यक्रम आम्ही दिला आहे. त्याचबरोबर संघटनात्मक बांधणी बुथ लेव्हलपासून राज्यपातळीपर्यंत ते देशपातळीपर्यंत मजबूत करणे पक्षाचा विस्तार करणे याला अधिक प्राधान्य देणार आहोत असे सांगतानाच सुनिल तटकरे यांनी पक्षाचा २७ वा वर्धापन दिन दादांना समर्पण... संघर्ष आणि संकल्प या विचारासह साजरा करणार आहोत असे स्पष्ट केले.

## स्फोटक उद्योग अधिक सुरक्षित करण्यासाठी राज्य सरकारची मोठी पुढाकार

### 'स्फोटके नियम 2008' मध्ये सुधारणा प्रस्ताव केंद्राकडे जाणार

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : नागपूर जिल्ह्यात मागील अडीच वर्षांत स्फोटक कंपन्यांमध्ये झालेल्या भीषण अपघातांमुळे झालेली जीवितहानी लक्षात घेऊन स्फोटक उद्योग अधिक सुरक्षित करण्याच्या दिशेने राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांच्या अध्यक्षतेखाली आज नागपूर येथील रामगिरी निवासस्थानी 'स्फोटके नियम, 2008' मध्ये सुधारणा सुचविणाऱ्या प्रस्तावासंदर्भात उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत स्फोटक कंपन्यांमधील अपघात रोखण्यासाठी आणि कामगारांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी केंद्र सरकारकडे सुधारणा प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीस वरिष्ठ पोलीस अधिकारी, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित विभागांचे मान्यवर उपस्थित होते. स्फोटक उद्योगातील वाढत्या जोखमींचा अभ्यास करून नियुक्त करण्यात आलेल्या अभ्यासगटाने तयार केलेल्या मसुद्यावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

अभ्यासगटाने सादर केलेल्या शिफारसींमध्ये स्फोटकांच्या निर्मिती प्रक्रियेत मानवी हस्तक्षेप कमीतकमी ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार उत्पादन प्रक्रियेचे जास्तीत जास्त स्वयंचलीकरण (Automation) करण्यात यावे, धोकादायक प्रक्रियांमध्ये रोबोटिक्सचा वापर वाढवावा, तसेच जोखीम असलेल्या विभागांमध्ये आवश्यक तेवढेच मनुष्यबळ कार्यरत राहील याची खात्री करावी, अशा महत्त्वपूर्ण सूचना करण्यात आल्या आहेत.

याशिवाय, स्फोटक उद्योगात सुरक्षेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील जागतिक मानकांचा अवलंब करणे, अत्याधुनिक सुरक्षा प्रणाली विकसित करणे, नियमित सुरक्षा तपासणी आणि आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करणे यासंदर्भातही शिफारसी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत स्फोटक उद्योगातील सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. नागपूरसह राज्यातील स्फोटक उत्पादन क्षेत्रात भविष्यात कोणतीही जीवितहानी होऊ नये, यासाठी कठोर सुरक्षा उपाययोजना आणि नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्य शासनाकडून तयार करण्यात आलेल्या या सुधारणा प्रस्तावाला अंतिम स्वरूप देऊन तो लवकरच केंद्र सरकारकडे सादर करण्यात येणार असून, त्याद्वारे स्फोटक उद्योगातील सुरक्षा व्यवस्थेत व्यापक आणि सकारात्मक बदल घडून येण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## उरणच्या रखडलेल्या प्रश्नांसाठी खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांना साकडे

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण नगरपालिकेतील गेल्या पाच महिन्यांपासून सुरू असलेल्या प्रशासकीय अराजकतेविरोधात शिवसेना उरण शहरप्रमुख सुलेमान शेख यांनी मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग (आप्पा) बारणे यांची भेट घेऊन उरणकरांच्या विविध नागरी समस्यांकडे लक्ष वेधले. उरण नगरपालिकेला कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसल्याने नागरिकांची अनेक महत्त्वाची कामे रखडली असून प्रशासनाचा कारभार अक्षरशः बेवारस झाल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

खासदार बारणे यांना देण्यात आलेल्या निवेदनात उरण शहरातील विविध समस्यांचा उल्लेख करण्यात



आला. मुख्याधिकारी नसल्यामुळे विकासकामे, प्रशासकीय निर्णय, नागरिकांची दैनंदिन कामे आणि विविध प्रस्ताव प्रलंबित राहिले असून सर्वसामान्य जनतेला मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.


यावेळी उरण मच्छी मार्केटमधील महिलांच्या शौचालयाचा गंभीर प्रश्नही उपस्थित करण्यात आला. कोळी समाजासह इतर समाजातील महिलांना शौचालय वापरताना अत्यंत गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. शौचालयाला दरवाजे नसल्यामुळे महिलांना कापडी पडदा लावून आत जावे लागत असल्याची धक्कादायक बाब खासदारांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. महिलांच्या सन्मान आणि सुरक्षिततेशी संबंधित हा विषय अत्यंत गंभीर असून याबाबत अनेकदा वृत्तपत्रांतून बातम्या प्रसिद्ध होऊनही प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली.उरणसारख्या वाढत्या शहरात महिलांना आजही अशा मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असेल, तर ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शहरातील स्वच्छता, आरोग्य आणि नागरी सुविधा यांसारख्या प्रश्नांकडेही निवेदनातून लक्ष वेधण्यात आले.

दरम्यान, खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी उरणमधील सर्व प्रश्न गांभीर्याने ऐकून घेतले. उरण नगरपालिकेला तातडीने नवीन मुख्याधिकारी मिळावा यासाठी संबंधित स्तरावर पाठपुरावा केला जाईल, तसेच नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.खासदारांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे उरणकरांच्या प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अनेक महिन्यांपासून रखडलेल्या प्रश्नांवर आता प्रशासन जागे होणार का, याकडे संपूर्ण उरणकरांचे लक्ष लागले आहे.

## उमरखेडमध्ये संविधान ग्रंथाचे वितरण व आदिवासी विद्यार्थी गुणगौरव सोहळा यशस्वीरित्या पार पडला

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : उमरखेड येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सामाजिक उपक्रमांतर्गत आदिवासी कृती समिती, आदिवासी कर्मचारी संघटना आणि पुस्तक यात्रा ग्रुप उमरखेड/महागाव यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान ग्रंथाचे वितरण व गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला. हा सोहळा दिनांक 7 जून 2026, रविवार, सकाळी 11.30 वाजता जिजाऊ भवन उमरखेड येथे पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. उत्तमराव पांडे यांचे मार्गदर्शन लाभले, तर उद्घाटक म्हणून मा. भारत टारपे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शकांमध्ये मा. तुकाराम भिसे, मा. राजेश धनजकर, मा. लक्ष्मण टारफे आणि मा. डी डी गायकवाड यांचा समावेश होता.



प्रमुख उपस्थिती म्हणून मा. पंजाब रणमले, मा. सुखदेव फोफसे, मा. अरुण बुरकूले आणि श्रीमती यशोदाताई चवरे उपस्थित होते. सोहळ्यात उपस्थित सर्व श्रोत्यांना संविधानाच्या प्रतीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित प्रमुख मार्गदर्शकांनी संविधानाचे महत्त्व आणि आदिवासी समाजातील योगदान यावर मार्गदर्शन केले, ज्यामुळे उपस्थितांना माहितीबद्ध आणि प्रेरणादायी अनुभव लाभला.

सोहळा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचा ठरला, आणि नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता वाढविण्यास मदत झाली.

## जननायक बिरसा मुंडा

आज ९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला.

आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**

# धरती आबा बिरसा मुंडांचा अमर वारसा



भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा विविध संघर्ष, त्याग, बलिदान आणि जनआंदोलनांनी समृद्ध झालेला इतिहास आहे. या इतिहासात अनेक महान नेत्यांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी अमिट ठसा उमटविला आहे. तथापि, दीर्घकाळ भारतीय इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहात काही अशा व्यक्तिमत्त्वांकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले, ज्यांनी आपल्या समाजासाठी आणि देशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये बिरसा मुंडा यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अस्तित्वासाठी संघर्ष करणारे बिरसा मुंडा हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे, सामाजिक परिवर्तनाचे आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक होते. आदिवासी समाज त्यांना प्रेमाने आणि आदराने “धरती आबा” म्हणजेच “धरतीचे पिता” म्हणून संबोधतो. ९ जून हा त्यांचा स्मृतिदिन असून हा दिवस केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा नसून आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, संघर्षाचा आणि स्वाभिमानाचा गौरव करण्याचा दिवस आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारत ब्रिटिश सत्तेच्या जोखडाखाली होता. इंग्रजांनी आपल्या प्रशासनिक आणि आर्थिक धोरणांच्या माध्यमातून भारतीय समाजातील विविध घटकांवर प्रभाव टाकला. या धोरणांचा सर्वाधिक विपरीत परिणाम आदिवासी समाजावर झाला. जंगल, जमीन आणि जल यांवर आधारित जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे अस्तित्वच धोक्यात आले. ब्रिटिशांनी वनकायदे लागू करून जंगलांवरील आदिवासींचे पारंपरिक हक्क नाकारले. महसूल व्यवस्थेमुळे त्यांच्या जमिनींवर कर लादले गेले. सावकार, व्यापारी आणि जमीनदार यांच्या संगनमताने आदिवासींच्या जमिनी बळकावल्या जाऊ लागल्या. परिणामी हजारो आदिवासी कुटुंबे आपल्या पारंपरिक उपजीविकेपासून वंचित झाली. त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर गंभीर परिणाम झाला. अशा कठीण परिस्थितीत आदिवासी समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले.

१५ नोव्हेंबर १८७५ रोजी आजच्या झारखंड राज्यातील उलिहातू या गावात बिरसा मुंडा यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सुगना मुंडा आणि आई करमी हातू हे सामान्य आदिवासी कुटुंबातील कष्टकरी होते. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला वारंवार स्थलांतर करावे लागत असे. अशा परिस्थितीत वाढलेल्या बिरसा यांना लहानपणापासूनच श्रम, संघर्ष आणि वास्तव जीवनाचा परिचय झाला. बालपणीच त्यांच्यामध्ये नेतृत्वाचे गुण आणि तीक्ष्ण निरीक्षणशक्ती दिसून येत होती. निसर्गाशी असलेले त्यांचे नाते अतिशय घट्ट होते. जंगल, डोंगर, नद्या आणि ग्रामीण जीवन यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला.

बिरसा यांनी प्राथमिक शिक्षण स्थानिक शाळेत घेतले. पुढे त्यांना जर्मन मिशन शाळेत शिक्षण घेण्याची संधी मिळाली. शिक्षणामुळे त्यांच्या विचारविश्वाला नवी दिशा मिळाली. त्यांनी समाजातील विषमता, अन्याय आणि शोषण यांचे बारकाईने निरीक्षण केले. मिशनरी शिक्षणाच्या काळात त्यांना आधुनिक शिक्षणाचा परिचय झाला, परंतु त्याचवेळी त्यांनी आपल्या समाजाच्या सांस्कृतिक परंपरांचे महत्त्वही जाणले. शिक्षणामुळे त्यांच्यात चिकित्सक दृष्टिकोन विकसित झाला. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, अशिक्षण आणि व्यसनाधीनतेची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासी समाजावर होणाऱ्या परिणामांचाही त्यांनी अभ्यास केला.

त्या काळात आदिवासी समाज अनेक समस्यांनी ग्रस्त होता. आर्थिक शोषण, सामाजिक उपेक्षा, अशिक्षण आणि अंधश्रद्धा यांमुळे समाजाची प्रगती खुंटली होती. बिरसा यांनी ओळखले की समाजाच्या उन्नतीसाठी सर्वप्रथम सामाजिक जागृती आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यांनी लोकांना मद्यपान, जादूटोणा, अंधश्रद्धा आणि इतर सामाजिक कुरीतींपासून दूर राहण्याचे आवाहन केले. त्यांनी स्वच्छता, शिक्षण, शिस्त, नैतिकता आणि परिश्रम यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि प्रेरणादायी विचारांमुळे हजारो लोक त्यांच्या सभांमध्ये सहभागी होऊ लागले.

बिरसा मुंडा हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते एक धार्मिक जागृतीचे प्रणेतेही होते. त्यांनी आदिवासी समाजाला त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक मुळांशी जोडण्याचा प्रयत्न केला. त्या काळात विविध धर्मप्रचारक संस्थांचा आदिवासी भागांमध्ये प्रभाव वाढत होता. अनेक आदिवासी आपली पारंपरिक ओळख गमावण्याच्या स्थितीत होते. बिरसा यांनी आदिवासी संस्कृती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचे संरक्षण करण्यासाठी चळवळ उभारली. त्यांनी एकेश्वरवादाचा संदेश दिला आणि नैतिक जीवन जगण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या अनुयायांमध्ये एक नवीन धार्मिक-सामाजिक चेतना निर्माण झाली. पुढे ही चळवळ “बिरसाईत” म्हणून प्रसिद्ध झाली.बिरसा यांच्या विचारांचा प्रभाव झपाट्याने वाढू लागला. लोक त्यांना केवळ समाजसुधारक म्हणून नव्हे, तर एक आध्यात्मिक नेता म्हणूनही पाहू लागले. त्यांच्या सभांमध्ये हजारो लोक सहभागी होत. त्यांनी लोकांमध्ये आत्मसन्मान आणि आत्मविश्वास निर्माण केला. त्यांनी सांगितले की कोणताही समाज आपल्या हक्कांसाठी जागरूक झाला तर त्याला कोणीही गुलाम बनवू शकत नाही. त्यांच्या संदेशामुळे आदिवासी समाजात एक नवीन जागृती निर्माण झाली.

दरम्यान, ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासींच्या समस्या अधिकच वाढत होत्या. जंगलांवरील निर्बंधांमुळे त्यांची उपजीविका धोक्यात आली होती. जमीनदार आणि सावकार यांच्या शोषणामुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी झाली होती. आदिवासींना त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर मजूर म्हणून काम करावे लागत होते. या परिस्थितीने बिरसा यांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण झाला. त्यांनी ओळखले की सामाजिक सुधारणांसोबतच राजकीय संघर्षही आवश्यक आहे. म्हणून त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून अन्यायाविरुद्ध लढण्याचे आवाहन केले.

याच काळात बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली “उलगुलान” या ऐतिहासिक चळवळीची सुरुवात झाली. “उलगुलान” म्हणजे महान क्रांती किंवा महान उठाव. ही चळवळ आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि स्वातंत्र्यासाठी उभारलेली व्यापक लोकचळवळ होती. बिरसा यांनी “अबुआ दिशुम, अबुआ राज” म्हणजे “आपला देश, आपले राज्य” हा संदेश दिला. या घोषणेमध्ये स्वराज्याची बीजे दडलेली होती. त्यांनी आदिवासींना अन्यायकारक कर भरण्यास नकार देण्याचे आणि आपल्या जमिनींचे रक्षण करण्याचे आवाहन केले.

१८९५ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांना अटक केली. त्यांना कारावासाची शिक्षा झाली. परंतु तुरुंगवासामुळे त्यांच्या लोकप्रियतेत घट झाली नाही. उलटपक्षी, त्यांचे विचार अधिक व्यापक प्रमाणात लोकांपर्यंत पोहोचले. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी नव्या जोमाने चळवळीला सुरुवात केली. त्यांनी आदिवासी समाजाला अधिक संघटित केले आणि ब्रिटिशांविरुद्ध संघर्षाची तयारी केली.

१८९९ आणि १९०० या काळात उलगुलान चळवळ आपल्या शिखरावर पोहोचली. हजारो आदिवासी बिरसा यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभे राहिले. अनेक ठिकाणी सरकारी यंत्रणांविरुद्ध प्रतिकार करण्यात आला. शोषण करणाऱ्या जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारण्यात आला. या उठावामुळे ब्रिटिश प्रशासन हादरून गेले. आदिवासी समाजाची एकजूट आणि त्यांची संघर्षशक्ती पाहून ब्रिटिश सरकार चिंतेत पडले.

उलगुलान चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ राजकीय बंड नव्हती. ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मुक्तीची चळवळ होती. आदिवासी समाजाला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांची जमीन वाचविणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या चळवळीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

ब्रिटिश सरकारने या उठावाचे दमन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लष्करी कारवाई केली. अनेक आदिवासींना अटक करण्यात आली. अनेकजण संघर्षात शहीद झाले. अखेर ३ फेब्रुवारी १९०० रोजी बिरसा मुंडा यांना अटक करण्यात आली. त्यांना रांची कारागृहात ठेवण्यात आले. कारागृहात असताना त्यांची प्रकृती खालावत गेली. ९ जून १९०० रोजी अवघ्या पंचविसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. अधिकृत नोंदीनुसार त्यांचा मृत्यू कॉलऱ्यामुळे झाला असे सांगण्यात आले. तथापि, त्यांच्या मृत्यूबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यांच्या अकाली निधनामुळे आदिवासी समाजाला मोठा धक्का बसला, परंतु त्यांच्या विचारांची ज्योत मात्र विझली नाही.बिरसा मुंडा यांचे जीवन हे प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. त्यांनी अत्यंत कमी वयात आपल्या समाजाला नवी दिशा दिली. त्यांनी आदिवासी समाजात स्वाभिमानाची भावना जागवली. अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य दिले. त्यांनी दाखवून दिले की संघटित समाज कोणत्याही शोषणकारी व्यवस्थेला आव्हान देऊ शकतो. त्यांच्या नेतृत्वामुळे आदिवासी समाजाला स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव झाली. त्यांच्या संघर्षाचा परिणाम पुढील काळात विविध धोरणांमध्ये दिसून आला. ब्रिटिश सरकारला आदिवासी प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे लागले. छोटानागपूर टेनन्सी कायद्यासारख्या उपाययोजनांमुळे आदिवासी जमिनींच्या संरक्षणासाठी काही प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे बिरसा मुंडा यांचे योगदान केवळ एका आंदोलनापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा दीर्घकालीन प्रभाव पडला.

स्वातंत्र्यानंतर भारताने सामाजिक न्याय आणि समतेच्या दिशेने अनेक पावले उचलली. आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. तरीही आज अनेक आदिवासी समुदाय दारिद्र्य, अशिक्षण, बेरोजगारी, आरोग्यविषयक समस्या आणि विस्थापन यांसारख्या आव्हानांना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत बिरसा मुंडा यांचे विचार आणि कार्य अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला आत्मसन्मान, संघटन आणि स्वावलंबनाचा संदेश आजही मार्गदर्शक आहे.

आजच्या काळात पर्यावरणसंवर्धन आणि शाश्वत विकास यांविषयी जगभर चर्चा होत आहे. आदिवासी समाजाची जीवनशैली आणि निसर्गाशी असलेले त्यांचे नाते हे शाश्वत विकासाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. बिरसा मुंडा यांनी जंगल, जमीन आणि जल यांचे महत्त्व ओळखले होते. त्यांचा संघर्ष हा पर्यावरणीय न्यायाचाही संघर्ष होता. त्यामुळे आधुनिक पर्यावरणीय विचारसरणीतही त्यांच्या कार्याचे विशेष महत्त्व आहे.आज भारत सरकार आणि विविध राज्य सरकारांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत.

त्यांच्या नावाने विद्यापीठे, संग्रहालये, विमानतळ, शैक्षणिक संस्था आणि संशोधन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जाणारा ‘जनजातीय गौरव दिवस’ हा आदिवासी समाजाच्या योगदानाचा राष्ट्रीय गौरव करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. यामुळे नवीन पिढीला त्यांच्या कार्याची ओळख होत आहे.

बिरसा मुंडा यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या जीवनाचा आणि कार्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. सामाजिक न्याय, समानता, स्वाभिमान, पर्यावरणसंवर्धन आणि सांस्कृतिक अस्मिता यांची मूल्ये जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आदिवासी समाजाच्या विकासासाठी संवेदनशीलतेने कार्य करणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या संस्कृतीचा सन्मान करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

९ जून हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की स्वातंत्र्य, समानता आणि न्याय यांसाठीचा संघर्ष कधीही व्यर्थ जात नाही. बिरसा मुंडा यांनी पेटवलेली स्वाभिमानाची ज्योत आजही लाखो लोकांच्या हृदयात तेवत आहे. त्यांनी दाखवून दिले की संघर्षातून परिवर्तन घडवून आणता येते आणि आत्मविश्वासाच्या बळावर कोणतीही गुलामी झुगारून देता येते. म्हणूनच ते केवळ इतिहासातील एक व्यक्ती नाहीत, तर एक विचार आहेत, एक प्रेरणा आहेत आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे शाश्वत प्रतीक आहेत.

धरती आबा बिरसा मुंडा यांचे जीवन भारतीय इतिहासातील तेजस्वी पर्व आहे. त्यांचा संघर्ष, त्याग, नेतृत्व आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश येणाऱ्या पिढ्यांना सतत प्रेरणा देत राहील.

आदिवासी स्वाभिमानाचे हे महानायक, स्वातंत्र्याचे अमर सेनानी आणि सामाजिक न्यायाचे अखंड दीपस्तंभ म्हणून त्यांचे नाव भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त या महान विभूतीस विनम्र अभिवादन करताना त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि न्याय्य, समताधिष्ठित व मानवतावादी समाज घडविण्याचा संकल्प करूया. हाच त्यांना वाहिलेला खरा श्रद्धासुमनांचा हार ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

